मुंबई, रायगड, पुणे, संभाजी नगर, जालना, नांदेड, अमरावती, नागपूर, यवतमाळ, बीड, लातूर,नाशिक, जळगाव,चंद्रपूर, येथून एकाच वेळी प्रसिद्ध होणारे एकमेव दैनिक

www.yuvakadhar.in E mail - dainikyuvakaadhar@gmail.com facebook : yuvakadhar

तरुणांचा बुलंद आवाज

दैनिक **युवक आधार** मराठी




■ मुख्य संपादक - सौ भारती संतोष आमले ■ संपादक - संतोष शिवदास आमले

● उपसंपादक - श्री विलास गायकवाड ● कार्यकारी संपादक - श्री जगन्नाथ रासवे ● निवासी संपादक - श्री राकेश पाटील ● सह संपादक - श्री मुकुंद कांबळे ● महाराष्ट्र संपादक - श्री अजय कापरे ● कायदेशीर सल्लागार - ॲड. सौ प्रियंका विजय मुंढे

■ वर्ष : 3 ■ अंक : १२३ ■ शनिवार, १० जानेवारी २०२६ ■ किंमत : ४ रु ■ पृष्ठ : ८ RNI MAHMAR/2023/89514

# प्रभाग ९ मध्ये भाजपचे वादळ!

**"शेकाप आघाडीवर उमेदवार आयात करण्याची वेळ आली; विकास केवळ भाजपनेच केला!" - शशिकांत शेळके यांचा घणाघात**



**दैनिक युवक आधार**

**पनवेल/प्रतिनिधी :** पनवेल महानगरपालिका निवडणुकीच्या प्रचाराने आता चांगलाच जोर धरला असून, प्रभाग ९ मधील राजकीय वातावरण चांगलेच तापले आहे. या प्रभागातील भाजप-युतीचे उमेदवार शशिकांत शेळके यांनी प्रतिस्पर्धी उमेदवारावर गंभीर आरोप करत निवडणुकीचे रणशिंग फुंकले आहे. "प्रकाश म्हात्रे हे जबरदस्तीने उमेदवारी लढवत आहेत," असा खळबळजनक दावा शेळके यांनी केला आहे.

**शेकापवर 'आयात' उमेदवाराची वेळ: शशिकांत शेळके** : प्रचारानिमित्त प्रसारमाध्यमांशी बोलताना शशिकांत शेळके म्हणाले की, या प्रभागात विकासाची सर्व कामे भाजपने केली आहेत. 'लाडकी बहीण' योजनेपासून ते केंद्र आणि राज्य सरकारच्या सर्व शासकीय योजना भाजपने घराघरात पोहोचवल्या आहेत. शेकापवर टीका करताना ते म्हणाले, "या प्रभागात उमेदवार आयात करण्याची वेळ शेकापवर आली आहे, ही मोठी शोकांतिका आहे. माझ्या गावाने गेल्या ३० वर्षांपासून माझ्यावर प्रेम केले आहे आणि आम्ही केवळ विकासाचा अजेंडा घेऊनच जनतेसमोर जात आहोत."

**वर्षा ठाकूर यांच्या उपस्थितीने कार्यकर्त्यांत उत्साह**

आमदार प्रशांत ठाकूर यांच्या पत्नी वर्षा प्रशांत ठाकूर यांनी प्रभाग ९ मध्ये विशेष प्रचार फेरी काढली. यावेळी कार्यकर्त्यांना संबोधित करताना त्या म्हणाल्या, "आ. प्रशांत ठाकूर आणि महानगरपालिकेच्या माध्यमातून या भागात कोट्यवधी रुपयांची विकासकामे पूर्ण झाली आहेत. मूलभूत सुविधांचे जाळे विणले गेले असून काही कामे प्रगतीपथावर आहेत. जनमानसाचे मन आणि मत दोन्ही भाजप युतीकडेच आहे. ज्याप्रमाणे लाडक्या बहिणींनी विधानसभा निवडणुकीत भरभरून आशीर्वाद दिले, तसेच महापालिकेतही मिळतील आणि आमचे चारही उमेदवार विजयी होतील."

**गावकीची एकजूट विजयाचा मार्ग: प्रभूदास (अण्णा) भोईर**

भाजपचे ज्येष्ठ नेते प्रभूदास भोईर यांनी विजयाचा विश्वास व्यक्त करताना सांगितले की, "गाव एकत्रित राहिले की इतिहास घडतो. आज खिडूकपाडा टबोडे वल्ली आणि आसुडगाव ही गावे भाजपच्या पाठीशी ठामपणे उभी आहेत. आ. प्रशांत ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली भाजपची ताकद मोठी आहे, त्यामुळे विजयाची खात्री आहे."

**प्रभाग ९ मधील भाजप-युतीचे अधिकृत उमेदवार:**

१. महादेव मधे (राष्ट्रवादी काँग्रेस - महायुती)

२. प्रतिभा सुभाष भोईर

३. दमयंती निलेश भोईर

४. शशिकांत शनिवार शेळके

वर्षा ठाकूर यांच्या प्रचार फेरीमुळे प्रभागातील कार्यकर्त्यांमध्ये सकारात्मक ऊर्जा निर्माण झाली असून, 'प्रशांत ठाकूर जिथे आहेत, तिथे विजयाची शंकाच उरत नाही,' असा सूर भाजप गोटातून उमटत आहे.

# ना खान, ना बान, राखू भगव्याची शान!

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी जनतेशी साधला संवाद



**दैनिक युवक आधार**

**छत्रपती संभाजीनगर :** हिंदुत्व हा आमचा आत्मा आहे आणि हिंदुत्वच आम्हाला विकासाचे राजकारण शिकवते. 'खान की बाण' या प्रश्नावर उत्तर देताना 'ना खान ना बान, राखू भगव्याची शान' असे कणखर उत्तर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले.महानगरपालिकेच्या आगामी निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर छत्रपती संभाजीनगर येथे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा आगळावेगळा 'टॉक शो' आयोजित करण्यात आला होता. या 'टॉक शो'चे शहरातील विविध ९० ठिकाणी थेट लाईव्ह प्रक्षेपण करण्यात आले होते. छत्रपती संभाजीनगर हे भारतातील प्रमुख शहर म्हणून ओळखले जावे हे स्वप्न प्रत्यक्षात उतरवण्याचा निर्धार आम्ही केला आहे.या कार्यक्रमात झालेल्या रॅपिड फायर प्रश्नावलीदरम्यान ते बोलत होते. या कार्यक्रमाला नागरिकांनी मोठ्या प्रमाणात सहभाग घेतला.भाजप जिल्हाध्यक्ष किशोर शितोळे यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले.

या कार्यक्रमात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शहराच्या विकासात्मक मुद्द्यांवर भाष्य केले. विविध क्षेत्रातील नामांकित व्यक्तींनी या 'टॉक शो'मध्ये सहभाग नोंदवला आणि आपली मते आणि प्रश्न मांडले. या कार्यक्रमास कॅबिनेट मंत्री अतुल सावे, माजी राज्यमंत्री खासदार डॉ. भागवत कराड, आमदार अनुराधा चव्हाण, आमदार संजय केणेकर, संघटन मंत्री संजय कोडगे, जिल्हाध्यक्ष किशोर शितोळे, उज्वला दहिफळे, छाया खाजेकर यांची उपस्थिती होती.

छत्रपती संभाजीनगरमध्ये क्रीडा विद्यापीठ सुरू करण्याचा विचार असून गरवारे स्टेडियमचा विकास केला जाणार आहे. देशाचे वीजेच्या वाहनांची राजधानी म्हणून संभाजीनगर पुढे येत असल्याचा आनंद आहे, असे मुख्यमंत्री फडणवीस यांनी म्हटले.

येत्या महानगरपालिका निवडणुकीत १५ तारखेला 'कमळ' या चिन्हाचे उमेदवार निवडून देण्याचे आवाहन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले.

**दोन महिन्यांत मुबलक पाणी मिळणार**

केंद्र सरकारच्या अमृत योजनेतून १ हजार कोटी रुपये आणि राज्य शासनाकडून १७०० कोटी रुपये असा एकूण २७०० कोटींचा पाणीपुरवठा प्रकल्प संभाजीनगरसाठी मंजूर केला. आज ३७०० अश्वशक्तीच्या मोटारीची टेस्टिंग यशस्वीपणे घेतली आहे. येत्या दोन महिन्यांत शहरवासीयांना मुबलक पाणी मिळणार आहे.




# सुवर्णकार समाजाच्यावतीने भाजप महायुतीच्या उमेदवारांना जाहीर पाठिंबा

**दैनिक युवक आधार**

**पनवेल (प्रतिनिधी) :** पनवेल महानगरपालिका सार्वत्रिक निवडणुकीसाठी भाजप महायुतीच्या उमेदवारांना नवी मुंबई सुवर्णकार विकास मंडळाने आपला पाठिंबा जाहीर केला आहे. या संदर्भात नवी मुंबई सुवर्णकार विकास मंडळाचे अध्यक्ष छोटूलाल मोरे यांनी पाठिंबा पत्र दिले आहे.

नवी मुंबई सुवर्णकार विकास मंडळाच्यावतीने आमदार प्रशांत ठाकूर यांच्याकडे पाठिंबा पत्र सुपूर्द करण्यात आले आहे. पाठिंबा पत्रात म्हंटले आहे कि, खारघर, कळंबोली, नावडे, तळोजा, कामोठे, खांदा कॉलनी, पनवेल, नवीन पनवेल व परिसरातील नवी मुंबई सुवर्णकार विकास मंडळाचे सभासद व त्यांचे कुटुंबीय बंधू भगिनींतर्फे महायुतीच्या उमेदवारांना जाहीर पाठिंबा देत आहोत, असे नवी मुंबई सुवर्णकार विकास मंडळाने जाहीर केले आहे.

# भावड्या चित्रपटाचे स्क्रिप्टचे शिर्डीच्या साईबाबांच्या चरणी अर्पण करत चित्रपटाचे प्रमोशन

**दैनिक युवक आधार**

**लोणी/ प्रतिनिधी :** भावड्या चित्रपटाची स्क्रिप्टचे शिर्डी साईबाबांच्या चरणी ठेवत बाबांच्या समाधीचे दर्शन घेतले यावेळी शिर्डी साईबाबा संस्थान चे मुख्यकार्यकारी अधिकारी श्री गोरक्षजी गाडीलकर साहेब यांच्या शुभ हस्ते भावड्या चित्रपटाचे अभिनेते प्रमोद पंडित यांचा शाल देऊन सत्कार करण्यात आला तसेच भावड्या चित्रपटाचे स्क्रिप्टची ची माहिती घेऊन क्लिपचेही शुभारंभ करण्यात आला यावेळी मुख्यकार्यकारी अधिकारी गोरक्ष गाडीलकर साहेब यांनी प्रमोद पंडित यांना भावड्या चित्रपटाला शुभेच्छा दिल्या ग्रामीण भागातील कलाकारांचा आम्हाला आहे अभिमान आहे साईबाबांचा आशीर्वाद आपल्या चित्रपटाला



मिळेल चित्रपटातील सर्व कलाकार टीमला माझ्याकडून शुभेच्छा असे बोलले यावेळी,निर्माते ज्ञानदेव शिंदे पत्रकार ज्ञानेश्वर साबळे यांच्या उपस्थित संपन्न झाला

# शेलघरचे अध्यक्ष अमृत भगत यांना बंधूशोक; रामनाथ भगत यांचे निधन

**दैनिक युवक आधार**

**उलवे, प्रतिनिधी :** शेलघर ग्रामस्थ मंडळाचे तहहयात माजी अध्यक्ष दिवंगत विठ्ठल भगत होते. त्यांचे दिवंगत ज. आ. भगत, दि. बा. पाटील, दत्तूशेठ पाटील, दत्ता पाटील यांच्यासोबत घनिष्ठ संबंध होते. सध्या दिवंगत विठ्ठल भगत यांचे चिरंजीव अमृत विठ्ठल भगत हे शेलघरचे अध्यक्ष आहेत. याच अमृत विठ्ठल भगत यांचे बंधू रामनाथ विठ्ठल भगत (अण्णा) यांचे नुकतेच हृदयविकाराच्या झटक्याने निधन झाले. गावातील सुख-दुःखात ते नेहमी सहभागी होत असत. आंतरराष्ट्रीय कामगार नेते महेंद्रशेठ घरत यांनी



भगत कुटुंबीयांचे नुकतेच सांत्वन केले. त्यांच्या मागे मुले, मुली, सुना, नातवंडे असा परिवार आहे. त्यांचे उत्तरकार्य शुक्रवारी (ता. १६) आहे.

## प्राचार्य डॉ. गणेश ठाकूर यांचा राज्यस्तरीय कुलाबा जीवन गौरव पुरस्काराने सन्मान



**दैनिक युवक आधार**

**नवीन पनवेल वार्ताहर :** पनवेल येथील महात्मा फुले कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयाचे प्राचार्य व रयत शिक्षण संस्थेचे माजी सचिव डॉ. गणेश अनंत ठाकूर यांना शैक्षणिक क्षेत्रातील बहुमूल्य योगदानासाठी यावर्षीच्या राज्यस्तरीय कुलाबा जीवन गौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. नुकतेच अलिबाग येथे संपन्न झालेल्या भव्यदिव्य समारंभात त्यांना आमदार जयंत पाटील व आमदार भाई जगताप यांच्या हस्ते हा मानाचा पुरस्कार प्रदान करण्यात आला.

प्राचार्य डॉ. गणेश ठाकूर यांचा आधीही अनेक सन्मानाच्या पुरस्कारांनी गौरव झालेला आहे. रयत शिक्षण संस्थेने प्रबोधनकार ठाकरे उत्कृष्ट प्राचार्य पुरस्कार देऊन त्यांच्या शैक्षणिक व प्रशासकीय कार्याचा गौरव केला आहे. देशातील सर्वात जुने व जागतिक कीर्तीच्या मुंबई विद्यापीठानेही आपल्या १६५ वर्षांच्या कारकिर्दीत सर्वप्रथम सुरु केलेल्या उत्कृष्ट प्राचार्य पुरस्काराचेही ते पहिले मानकरी ठरले आहेत. याशिवाय रायगडभूषण व कोकणरत्न यांसारख्या प्रतिष्ठेच्या पुरस्कारांनीही ते सन्मानित झाले आहेत. या पुरस्काराचा स्वीकार केल्यानंतर आपल्यावर होणाऱ्या कौतुकाच्या वर्षावाला प्रतिक्रिया देताना ते म्हणाले, “मला मिळालेला हा पुरस्कार म्हणजे माझ्या महाविद्यालयातील सर्व घटकांना मिळालेला सन्मान आहे. हे माझे एकट्याचे यश नसून माझ्या महाविद्यालातील सर्वांचे आहे.” सर्व पदाधिकारी, कुटुंबीय, आप्तेष्ट, आजी-माजी विद्यार्थी या सर्वांच्या शुभेच्छांचा आपण कृतज्ञतापूर्वक स्वीकार करीत आहोत, असे सूतोवाचही त्यांनी या आनंदाच्या प्रसंगी व्यक्त केले.

प्राचार्य डॉ. गणेश ठाकूर यांना हा राज्यस्तरीय पुरस्कार प्राप्त झाल्याबद्दल रयत शिक्षण संस्थेचे चेअरमन चंद्रकांत दळवी, सचिव विकास देशमुख, महाविद्यालय विकास समितीचे चेअरमन रामशेठ ठाकूर, रयत शिक्षण संस्थेच्या रायगड विभागीय सल्लागार समितीचे चेअरमन बाळाराम पाटील, जे. एम. म्हात्रे, महेंद्र घरत, अरुणशेठ भगत, महाविद्यालयाच्या माजी विद्यार्थी मंडळाचे अध्यक्ष परेश ठाकूर आदी मान्यवरांनी त्यांचे विशेष कौतुक केले. यासोबतच महाविद्यालातील सर्व प्राध्यापक, शिक्षकेतर सेवक व विद्यार्थ्यांनीही त्यांना शुभेच्छा दिल्या. समाजाच्या विविध स्तरांतूनही त्यांच्यावर कौतुकाचा वर्षाव होत आहे.

# रस्ते अपघातांविरोधात पनवेल 'खाकी' मैदानात

## बांठिया हायस्कूलमध्ये विद्यार्थ्यांना मिळाला सुरक्षिततेचा 'महामंत्र

**दैनिक युवक आधार**

**नवीन पनवेल वार्ताहर :** रस्त्यांवरील वाढते अपघात आणि नियमांचे होणारे उल्लंघन याला चाप लावण्यासाठी पनवेल शहर वाहतूक शाखेने आता कंबर कसली आहे. केवळ दंड आकारून नव्हे, तर सुजाण नागरिक घडवून बदल घडवण्याच्या इराद्याने के.ए. बांठिया हायस्कूल, नवीन पनवेल येथे वाहतूक पोलिसांनी एक भव्य आणि 'कडक' जनजागृती कार्यक्रम राबवला. या कार्यक्रमाद्वारे इयत्ता ८ वी आणि ९ वीच्या २०० हून अधिक विद्यार्थ्यांच्या मनात रस्ते सुरक्षेचे बीज रोवण्यात आले.



या कार्यक्रमाचे वैशिष्ट्य म्हणजे केवळ भाषणे न देता, वाहतूक शाखेच्या बड्या अधिकाऱ्यांनी आणि अंमलदारांनी प्रत्यक्ष मैदानात उतरून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. पनवेल शहर वाहतूक शाखेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक औदुंबर भा. पाटील यांच्या नेतृत्वाखाली हा कार्यक्रम पार पडला. यावेळी बडगुजर (गव्हाण फाटा वाहतूक शाखा), पोलीस उपनिरीक्षक जीवन शेरखाने, तुकाराम कदम यांनी आपल्या अनुभवाचा खजिना विद्यार्थ्यांसमोर रिकामा केला. तसेच एएसआय तायडे, पो.हवा येळे, अमीर मुलाणी, ज्ञानेश्वर पवार, अभिमन्यू लाळगे, अंकुश ओंबाशे ,केशव निकम, महेश बोरकर आणि इतर पोलीस अंमलदारांनी अत्यंत शिस्तबद्ध पद्धतीने विद्यार्थ्यांना वाहतुकीचे नियम समजावून सांगितले.

केवळ पुस्तकी ज्ञान न देता, पोलिसांनी यावेळी झेब्रा क्रॉसिंगचे थेट प्रात्यक्षिक करून दाखवले. रस्ता ओलांडताना कोणती काळजी घ्यावी, सिग्नलचे महत्त्व काय, हे एका 'छोट्या पोलीस' उभ्या करून दाखवलेल्या प्रयोगामुळे विद्यार्थ्यांच्या मनावर कायमचे कोरले गेले. हेल्मेट न घालण्याचे परिणाम आणि सीट बेल्टचे महत्त्व सांगताना पोलिसांनी दिलेली उदाहरणे ऐकून विद्यार्थीही अवाक झाले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी शाळेचे प्राचार्य माळी, उपप्राचार्य आंबरे, आणि सुपरवायझर महाजन यांनी मोलाचे सहकार्य केले. तसेच शाळेचे माजी विद्यार्थी अजय सूर्यवंशी व शेखर म्हात्रे यांची उपस्थिती विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी ठरली. कार्यक्रमाचा समारोप अत्यंत भावनिक आणि उत्साही वातावरणात झाला. वरिष्ठ पोलीस निरीक्षक औदुंबर पाटील यांनी उपस्थित २०० विद्यार्थ्यांना 'वाहतूक सुरक्षा शपथ' दिली. "नियम पाळणे हा पर्याय नाही, तर ती जबाबदारी आहे," हा संदेश यावेळी देण्यात आला. या कडक शिस्तीच्या कार्यक्रमानंतर पोलिसांनी सर्व विद्यार्थ्यांना कॅडबरी वाटप करून प्रेमाचा गोडवा देखील पेरला.

## जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, रायगड यांच्या मार्गदर्शनाखाली राष्ट्रीय युवा दिनानिमित्त शांतीवन, नेरे येथे कायदेविषयक जनजागृती कार्यक्रम संपन्न

**दैनिक युवक आधार**

**नवीन पनवेल वार्ताहर :** जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, रायगड यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच तालुका विधी सेवा समिती, पनवेल यांच्या माध्यमातून हिंदी विद्या प्रचार समितीचे लॉ कॉलेज, घाटकोपर यांच्या राष्ट्रीय सेवा योजना (एनएसएस) शिबिराच्या निमित्ताने शांतीवन, नेरे येथे राष्ट्रीय युवा दिनानिमित्त कायदेविषयक जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.



या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सन्माननीय न्यायाधीश अभिव्यक्ती बडगुजर, द्वितीय दिवाणी न्यायाधीश (वरिष्ठ स्तर), पनवेल या उपस्थित होत्या. त्यांनी कायद्याचे शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांसमोर भविष्यात उभ्या राहणाऱ्या आव्हानांचा सखोल आढावा घेत, कोणती कृतीशील व सकारात्मक पावले उचलणे आवश्यक आहे याबाबत विविध उदाहरणांच्या साहाय्याने मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांनी केवळ शैक्षणिक ज्ञानापुरते मर्यादित न राहता सामाजिक बांधिलकी जपत जबाबदार नागरिक म्हणून कार्य करावे, असे मौलिक विचार त्यांनी मांडले.या कार्यक्रमास महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. मधुरा कलमकर, ॲड. स्वाती सोनवणे (रिटेनर ॲडव्होकेट), ॲड. दिपाली बोहरा (पॅनल ॲडव्होकेट) तसेच पी.एल.व्ही. शैलेश कोंडसकर यांनी उपस्थित राहून विविध कायदेविषयक व सामाजिक विषयांवर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. तसेच या वेळी पॅनल ॲड. सुयश कामेरकर, ॲड. पौर्णिमा सुतार, ॲड. प्रज्ञा भगत, ॲड. नागेश हिरवे, ॲड. विकी दुसिंग तसेच पी.एल.व्ही. सुदर्शन गोवारी आदी मान्यवरांची उपस्थिती लाभली. सुमारे ८० विद्यार्थ्यांच्या उपस्थितीत हा कार्यक्रम यशस्वीपणे पार पडला. कायदेविषयक जनजागृतीसह युवकांमध्ये सामाजिक व कायदेशीर जाणीव निर्माण करण्याच्या दृष्टीने हा उपक्रम अत्यंत उपयुक्त ठरला.

## राजाभाऊ ठाकूर यांच्या वाढदिवसानिमित्त श्रीवर्धन उपजिल्हा रुग्णालयात रुग्णांना फळ वाटप

**दैनिक युवक आधार**

**श्रीवर्धन तालुका प्रतिनिधी/अनिकेत मोहितन :** राष्ट्रीय काँग्रेस पक्षाचे रायगड जिल्हा उपाध्यक्ष मा. श्री. राजाभाऊ ठाकूर यांच्या वाढदिवसानिमित्त आज श्रीवर्धन येथे सामाजिक बांधिलकी जपत राजाभाऊ ठाकूर मित्र मंडळाच्या वतीने उपजिल्हा रुग्णालय, श्रीवर्धन येथे रुग्णांना फळ वाटपाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला.

या उपक्रमातून रुग्णांच्या आरोग्यासाठी पोषणाचे महत्त्व अधोरेखित करत त्यांना मानसिक आधार देण्याचा प्रयत्न करण्यात आला. रुग्णालयातील रुग्ण व त्यांच्या नातेवाइकांनी या उपक्रमाचे स्वागत करत आयोजकांचे आभार मानले.

या कार्यक्रमास श्रीवर्धन नगरीचे नगराध्यक्ष ॲड. श्री. अतुलजी चौगुले साहेब यांच्यासह शिवराज चाफेकर, सागर जाधव, अरुण शिगवण,




संदीप रिकामे, अबरार काळोखे, इम्तियाज कोकाटे, मुजम्मील चोगले, अजिंकेश भाटकर, प्रियांका कदम, संघवी पेडणेकर, प्रिया मदन तसेच मित्र परिवार मोठ्या संख्येने उपस्थित होते.

सामाजिक जाणीव आणि सेवाभावातून राबविण्यात आलेला हा उपक्रम नागरिकांमध्ये सकारात्मक संदेश देणारा ठरला. राजाभाऊ ठाकूर मित्र मंडळाच्या या स्तुत्य उपक्रमाचे सर्व स्तरातून कौतुक होत आहे.

## उरणची आंतरराष्ट्रीय नेमबाज अवनी कोळी सुवर्ण कन्याने पटकावले दोन टीम सुवर्ण व दोन वैयक्तिक दोन कांस्यपदक

**दैनिक युवक आधार**

**नवीन पनवेल वार्ताहर :** 16 डिसेंबर 2025 ते 5 जानेवारी 2026 दरम्यान डॉ. कर्णिसिंग शूटिंग रेंज दिल्ली येथे झालेल्या 68 व्या राष्ट्रीय शॉटगन डबल ट्रॅप ज्युनिअर वुमन टीम व यूथ वुमन टीम मध्ये अवनी कोळी हिने दोन सुवर्ण पदक व वैयक्तिक ज्यू अँड युथ मध्ये दोन कांस्य पदक मिळवले तसेच कार्तिकी देवळेकर व वरा देवळेकर यांनी स्पर्धेत महाराष्ट्र संघाचे प्रतिनिधित्व करत विख्यात नेमबाज रिनॉन्ड शूटर ही पदवी



संपादन केली.

तिघी जणी सिद्धांत रायफल क्लबच्या मेंबर आहेत. त्यांचे प्रशिक्षक रॅलस्टॅन कोईलो यांच्याकडे अवनी कोळी प्रशिक्षण घेत आहे व कार्तिकी आणि वरा ह्या बहिणी मोहणिश हिरवे यांच्याकडे नेमबाजीचे प्रशिक्षण बालेवाडी येथील शूटिंग रेंज वर घेत असतात. त्यांच्या या यशाबद्दल क्लबचे अध्यक्ष विजय खारकर, सचिव प्रशिक्षक राष्ट्रीय नेमबाजी किशन खारके, प्रीतम पाटील, महेश फुलोरे, नगरसेवक अंबरनाथ, अजिंक्य चौधरी काटई, समाधान घोपरकर, किरण माळी, अविनाश भगत, सूरज थले, किरण मोहिते, प्रशिक्षक अलंकार कोळी, राजु मुंबईकर मित्र परिवार यांनी अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या.

## पत्रकार दिनानिमित्त पत्रकार उत्कर्ष समितीचा सन्मान सोहळा उत्साहात संपन्न

**दैनिक युवक आधार**

**सायली साळूंके उरण प्रतिनिधी :** पत्रकार दिनाचे औचित्य साधून पत्रकार उत्कर्ष समितीच्या वतीने भव्य कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. परंपरा, शिस्त आणि मूल्यांची जपणूक करत या कार्यक्रमात पत्रकारिता क्षेत्रातील योगदानाचा सन्मानपूर्वक गौरव करण्यात आला.

कार्यक्रमाची सुरुवात गणेश वंदना तसेच श्री छत्रपती शिवाजी महाराजांना अभिवादन करून करण्यात आली. त्यानंतर समितीच्या वतीने संपूर्ण टीमचे मनःपूर्वक आभार मानण्यात आले. या प्रसंगी सर्व पदाधिकाऱ्यांना




सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले.

या कार्यक्रमाला डॉ. अशोक म्हात्रे (अध्यक्ष, महाराष्ट्र), डॉ. वैभव विजय पाटील (सचिव, महाराष्ट्र), श्री. शैलेश ठाकूर (खजिनदार, महाराष्ट्र), श्री. ज्ञानेश्वर कोळी (सहसचिव, महाराष्ट्र), श्री. रोहिदास जाधव (सदस्य, महाराष्ट्र) आणि श्री. दिलीप गायकर (सदस्य, महाराष्ट्र) यांची प्रमुख उपस्थिती लाभली.कार्यक्रमात महेंद्र घरात यांची खास उपस्थिती विशेष आकर्षण ठरली. त्यांच्या उपस्थितीमुळे कार्यक्रमास वेगळीच ऊर्जा व स्फूर्ती लाभली.

यावेळी पत्रकार उत्कर्ष समितीच्या वतीने सौ. पूजा चव्हाण, कु. सायली साळुंके, कु. राणीता ठाकूर, सौ. तृप्ती भोईर आणि रंजना पाटील यांचाही सन्मान करण्यात आला. पत्रकारितेच्या क्षेत्रात निष्ठा, सातत्य आणि समाजभान जपणाऱ्या या मान्यवरांचा गौरव करत कार्यक्रम उत्साहात आणि सन्मानाच्या वातावरणात संपन्न झाला.

हा सोहळा केवळ सन्मानाचा नव्हे, तर पत्रकारितेच्या उज्ज्वल भविष्यासाठी प्रेरणा देणारा ठरला— कालच्या मूल्यांवर उभा राहून उद्याच्या दिशेने नेणारा, थोडासा गंभीर आणि थोडासा अभिमानाने हसणारा.

# विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी शिक्षकांचा स्वखर्चातून पुढाकार

**अंभोरा प्रतिनिधी/बाळासाहेब रकटाटे :** आष्टी तालुक्यातील पिंपळगाव घाट येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेमध्ये विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीस चालना मिळावी, या उदात्त हेतूने शाळेतील शिक्षकांनी स्वखर्चातून शालेय साहित्याचे वाटप केले. ग्रामीण भागातील अनेक विद्यार्थी आर्थिक अडचणींमुळे आवश्यक शालेय साहित्यापासून वंचित राहू नयेत, यासाठी शिक्षकांनी स्वतः पुढाकार घेत हा स्तुत्य उपक्रम राबविला.या उपक्रमाअंतर्गत विद्यार्थ्यांना वही, अंकलीपी तसेच इतर आवश्यक शालेय साहित्य वितरित करण्यात आले. साहित्य मिळताच विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर आनंद झळकला. अभ्यासासाठी लागणारी साधने उपलब्ध झाल्यामुळे विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास वाढून ते




नियमितपणे व मन लावून अभ्यास करतील, असा विश्वास व्यक्त करण्यात आला. शिक्षकांनी दाखविलेली ही सामाजिक बांधिलकी केवळ अध्यापनापुरती मर्यादित न राहता विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी उपयुक्त ठरत आहे. शाळा म्हणजे केवळ शिक्षण देण्याचे केंद्र नसून संस्कार, माणुसकी आणि सामाजिक जाणीव निर्माण करणारे मंदिर आहे, हे या उपक्रमातून अधोरेखित झाले आहे.या उपक्रमामागे शाळेतील शिक्षक राजेंद्र आव्हाड व कैलास दहातोंडे यांची मोलाची भूमिका असून, कोणत्याही शासकीय निधीची अपेक्षा न ठेवता त्यांनी स्वतःच्या खिशातून खर्च करून विद्यार्थ्यांसाठी आवश्यक साहित्य उपलब्ध करून दिले. विद्यार्थ्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी केलेल्या या पदरमोडीमुळे सर्व स्तरातून त्यांचे कौतुक होत आहे.या उपक्रमाचे पालक, ग्रामस्थ तसेच शाळा व्यवस्थापन समितीच्या सदस्यांकडून विशेष प्रशंसा करण्यात आली. “माझी शाळा, माझा अभिमान” ही भावना जपत शिक्षकांनी केलेले हे कार्य इतर शाळांसाठीही प्रेरणादायी ठरणारे असल्याची प्रतिक्रिया व्यक्त करण्यात येत आहे.

## विकासाचा निर्धार; पनवेल प्रभाग १४मध्ये इक़्बाल काझी यांचा दमदार प्रचार

- भाजपकडून अधिकृत उमेदवारी, विकासाच्या अजेंड्यावर ठाम भूमिका
- पाणी, रस्ते, गटारे, स्वच्छतेवर भर; ‘स्लम हटवा- चांगले घर बनवा’ संकल्प
- गरिब, गरजू आणि मागासवर्गीय विद्यार्थ्यांसाठी थेट मदतीची ग्वाही



**दैनिक युवक आधार**

**न्यूज ब्युरो पनवेल :** पनवेल महानगरपालिका निवडणूक २०२६ च्या पार्श्वभूमीवर प्रभाग क्रमांक १४ मधून भारतीय जनता पक्षाकडून अधिकृत नगरसेवक उमेदवार म्हणून इक़्बाल काझी यांनी प्रचाराला वेग दिला आहे. विकासाभिमुख अजेंड्यासह ते मतदारांशी थेट संवाद साधत असून केंद्र व राज्य सरकारच्या योजनांचा लाभ सर्वसामान्यांपर्यंत पोहोचवण्याचा निर्धार त्यांनी व्यक्त केला आहे. प्रचारात स्वच्छ पाणीपुरवठा, चांगले रस्ते, सक्षम गटार व्यवस्था, सार्वजनिक दिवे आणि कचरा व्यवस्थापन सुधारण्याचे आश्वासन देण्यात येत आहे. ‘स्लम हटवा – चांगले घर बनवा’ या भूमिकेनुसार झोपडपट्टीत राहणाऱ्या कुटुंबांना शासनाच्या गृहनिर्माण योजनांचा लाभ मिळवून देण्याचा संकल्प करण्यात आला आहे. तसेच मोफत रेशन, गरजूंसाठी वैद्यकीय मदत आणि मुलांच्या शिक्षणासाठी सहकार्य करण्याची ग्वाही त्यांच्यामार्फत देण्यात आली आहे. भाजप नेतृत्वाचा पाठिंबा असल्याने प्रभाग क्रमांक १४ चा सर्वांगीण विकास साधण्याचा निर्धार इक़्बाल काझी यांनी व्यक्त केला आहे.

## खान्देश सामाजिक विकास संस्थेचा भाजपला जाहीर पाठिंबा

**दैनिक युवक आधार**

**पनवेल (प्रतिनिधी) :** खान्देश सामाजिक विकास संस्था रायगडने पनवेल महानगरपालिका सार्वत्रिक निवडणुकीसाठी भाजप उमेदवारांना आपला बिनशर्त पाठिंबा जाहीर केला आहे. त्यांनी या पाठिंब्याचे पत्र आमदार प्रशांत ठाकूर यांच्याकडे सुपूर्द केले आहे. पनवेल, नवीन पनवेल, खांदा कॉलनी, कामोठे, कळंबोली, खारघर येथील सर्व मंडळे भाजपच्या उमेदवारांना जाहीर पाठिंबा देत असून सर्व उमेदवारांना निवडून आणण्यासाठी प्रयत्नशील असल्याचे त्यांनी पाठिंबा पत्राद्वारे आश्वासित केले आहे.

## जाहीर नोटीस

**गीता सुभाष गौतम - अपिलार्थी**

विरुध्द

सहायक आयुक्त महापालिका जी/दक्षिण विभाग व इतर ३

उत्तरार्थी

प्रति, जेटी भीमय्या नरसय्या आनंद नगर, को.ऑप. हौ. सोसा डॉ. ई. मोझेस रोड, वरळी मुंबई-४०० ०१८

(उत्तरार्थी क्र. ४)

सदर जाहिर नोटीसी द्वारे आपणांस सुचित करण्यात येते की, अपिलार्थी यांनी महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मुलन व पुनर्विकास) अधिनियम, १९७१ मधील कलम ३५ अंतर्गत मा. अपर जिल्हाधिकारी तथा अपिलीय प्राधिकारी, मुंबई शहर, पहिला मजला, जुने जकात घर, शहिद भगतसिंग रोड, फोर्ट, मुंबई ४००००१ येथे आनंदनगर को. ऑ.हौ. सोसा सहकारी गृहनिर्माण संस्थेच्या परि-II मध्ये स्वतःचे नाव समाविष्ट करून पात्र करणेकामी अपिलार्थी यांनी अपील अर्ज दाखल केला आहे.

प्रश्नांकित झोपडी / अपिलार्थी यांनी दावा केलेली झोपडी आपणाकडून खरेदी केल्याचे दिसून येत असल्याने सदर अपील प्रकरणात आपणांस उत्तरार्थी क्र. ०४ केले आहे. प्रकरणी दि. १५.१२.२०२५ रोजीचे सुनावणीमध्ये मा.अपर जिल्हाधिकारी तथा अपिलीय प्राधिकारी, मुंबई शहर यांनी आपणांस पुढील सुनावणी तारखेबाबत जाहिर नोटीसीद्वारे अवगत करणेचे निर्देश दिले आहेत.

सदर जाहिर नोटीसीद्वारे आपणांस सुचित करण्यात येते की, सदर प्रकरणामध्ये आपण उत्तरार्थी क्र. ०४ असून, दि. १३/०१/२०२६ रोजी दुपारी १२.०० वाजता मा. अपर जिल्हाधिकारी तथा अपिलीय प्राधिकारी, मुंबई शहर यांचे दालनात सुनावणी आयोजित केलेली आहे. तरी सदर सुनावणीस आपण उपस्थित / हजर राहून, आपली बाजू मांडावी. उपरोक्त नमूद केलेल्या दिवशी आपण स्वतः अथवा आपले प्राधिकृत प्रतिनिधी उपस्थित न राहिल्यास, आपणास काहीही सांगावयाचे नाही, असे गृहित धरुन प्रकरणी गुणवत्तेवर निर्णय घेण्यात येईल, यांची नोंद घ्यावी.

कोर्टाचा शिक्का

**सहाय्यक महसुल अधिकारी**
**अपर जिल्हाधिकारी कार्यालय, मुंबई शहर**

## जाहीर नोटीस

**श्री. किशोर रमाकांत गुडेकर - अपिलार्थी**

विरुध्द

सहायक आयुक्त महापालिका जी/दक्षिण विभाग व इतर ३

- उत्तरार्थी

प्रति, रागिनी श्रीधर शिर्के आनंदनगर को.ऑप. हौ. सोसायटी

डॉ.ई. मोझेस रोड, मुंबई-४०० ०१८

(उत्तरार्थी क्र. ४)

सदर जाहिर नोटीसी द्वारे आपणांस सुचित करण्यात येते की, अपिलार्थी यांनी महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मुलन व पुनर्विकास) अधिनियम, १९७१ मधील कलम ३५ अंतर्गत मा. अपर जिल्हाधिकारी तथा अपिलीय प्राधिकारी, मुंबई शहर, पहिला मजला, जुने जकात घर, शहिद भगतसिंग रोड, फोर्ट, मुंबई ४००००१ येथे आनंदनगर को. ऑ.हौ. सोसा सहकारी गृहनिर्माण संस्थेच्या परि-II मध्ये स्वतःचे नाव समाविष्ट करून पात्र करणेकामी अपिलार्थी यांनी अपील अर्ज दाखल केला आहे. प्रश्नांकित झोपडी / अपिलार्थी यांनी दावा केलेली झोपडी आपणाकडून खरेदी केल्याचे दिसून येत असल्याने सदर अपील प्रकरणात आपणांस उत्तरार्थी क्र. ०४ केले आहे. प्रकरणी दि. १५.१२.२०२५ रोजीचे सुनावणीमध्ये मा. अपर जिल्हाधिकारी तथा अपिलीय प्राधिकारी, मुंबई शहर यांनी आपणांस पुढील सुनावणी तारखेबाबत जाहिर नोटीसीद्वारे अवगत करणेचे निर्देश दिले आहेत.

सदर जाहिर नोटीसीद्वारे आपणांस सुचित करण्यात येते की, सदर प्रकरणामध्ये आपण उत्तरार्थी क्र. ०४ असून, दि. १३/०१/२०२६ रोजी दुपारी १२.०० वाजता मा. अपर जिल्हाधिकारी तथा अपिलीय प्राधिकारी, मुंबई शहर यांचे दालनात सुनावणी आयोजित केलेली आहे.

तरी सदर सुनावणीस आपण उपस्थित / हजर राहून, आपली बाजू मांडावी. उपरोक्त नमूद केलेल्या दिवशी आपण स्वतः अथवा आपले प्राधिकृत प्रतिनिधी उपस्थित न राहिल्यास, आपणास काहीही सांगावयाचे नाही, असे गृहित धरुन प्रकरणी गुणवत्तेवर निर्णय घेण्यात येईल, यांची नोंद घ्यावी.

कोर्टाचा शिक्का

**सहाय्यक महसुल अधिकारी अपर जिल्हाधिकारी**
**कार्यालय, मुंबई शहर**

## जाहीर नोटीस

**श्री. आदित्य राज गौतम - अपिलार्थी**

विरुध्द

सहायक आयुक्त महापालिका जी/दक्षिण विभाग व इतर ३

उत्तरार्थी

प्रति, शामसुंदर राजाराम दुबे आनंदनगर को. ऑप. हौ. सोसायटी डॉ.ई. मोझेस रोड, मुंबई-४०० ०१८

(उत्तरार्थी क्र. ४)

सदर जाहिर नोटीसी द्वारे आपणांस सुचित करण्यात येते की, अपिलार्थी यांनी महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मुलन व पुनर्विकास) अधिनियम, १९७१ मधील कलम ३५ अंतर्गत मा. अपर जिल्हाधिकारी तथा अपिलीय प्राधिकारी, मुंबई शहर, पहिला मजला, जुने जकात घर, शहिद भगतसिंग रोड, फोर्ट, मुंबई ४००००१ येथे आनंदनगर को. ऑ. हौ. सोसा सहकारी गृहनिर्माण संस्थेच्या परि-II मध्ये स्वतःचे नाव समाविष्ट करून पात्र करणेकामी अपिलार्थी यांनी अपील अर्ज दाखल केला आहे.

प्रश्नांकित झोपडी / अपिलार्थी यांनी दावा केलेली झोपडी आपणाकडून खरेदी केल्याचे दिसून येत असल्याने सदर अपील प्रकरणात आपणांस उत्तरार्थी क्र. ०४ केले आहे. प्रकरणी दि. १५.१२.२०२५ रोजीचे सुनावणीमध्ये मा. अपर जिल्हाधिकारी तथा अपिलीय प्राधिकारी, मुंबई शहर यांनी आपणांस पुढील सुनावणी तारखेबाबत जाहिर नोटीसीद्वारे अवगत करणेचे निर्देश दिले आहेत.

सदर जाहिर नोटीसीद्वारे आपणांस सुचित करण्यात येते की, सदर प्रकरणामध्ये आपण उत्तरार्थी क्र. ०४ असून, दि. १३/०१/२०२६ रोजी दुपारी १२.०० वाजता मा.अपर जिल्हाधिकारी तथा अपिलीय प्राधिकारी, मुंबई शहर यांचे दालनात सुनावणी आयोजित केलेली आहे.

तरी सदर सुनावणीस आपण उपस्थित / हजर राहून, आपली बाजू मांडावी. उपरोक्त नमूद केलेल्या दिवशी आपण स्वतः अथवा आपले प्राधिकृत प्रतिनिधी उपस्थित न राहिल्यास, आपणास काहीही सांगावयाचे नाही, असे गृहित धरुन प्रकरणी गुणवत्तेवर निर्णय घेण्यात येईल, यांची नोंद घ्यावी.

कोर्टाचा शिक्का

**सहाय्यक महसुल अधिकारी**
**अपर जिल्हाधिकारी कार्यालय, मुंबई शहर**

## जाहीर नोटीस

**श्रध्दा रत्नम देवेंद्र - अपिलार्थी**

विरुध्द

सहायक आयुक्त महापालिका जी/दक्षिण विभाग व इतर ३

- उत्तरार्थी

प्रति,

दनमा @ धनाबाई जयपाल देवेंद्र

(उत्तरार्थी क्र.२)

सदर जाहिर नोटीसी द्वारे आपणांस सुचित करण्यात येते की, अपिलार्थी यांनी महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मुलन व पुनर्विकास) अधिनियम, १९७१ मधील कलम ३५ अंतर्गत मा.अपर जिल्हाधिकारी तथा अपिलीय प्राधिकारी, मुंबई शहर, पहिला मजला, जुने जकात घर, शहिद भगतसिंग रोड, फोर्ट, मुंबई ४००००१ येथे माता रमाबाई आंबेडकरनगर को.ऑ.हौ. सोसा सहकारी गृहनिर्माण संस्थेच्या परि-II मध्ये स्वतःचे नाव समाविष्ट करून पात्र करणेकामी अपिलार्थी यांनी अपील अर्ज दाखल केला आहे. प्रश्नांकित झोपडी / अपिलार्थी यांनी दावा केलेली झोपडी आपणाकडून खरेदी केल्याचे दिसून येत असल्याने सदर अपील प्रकरणात आपणांस उत्तरार्थी क्र. ०४ केले आहे. प्रकरणी दि. १५.१२.२०२५ रोजीचे सुनावणीमध्ये मा.अपर जिल्हाधिकारी तथा अपिलीय प्राधिकारी, मुंबई शहर यांनी आपणांस पुढील सुनावणी तारखेबाबत जाहिर नोटीसीद्वारे अवगत करणेचे निर्देश दिले आहेत.

सदर जाहिर नोटीसीद्वारे आपणांस सुचित करण्यात येते की, सदर प्रकरणामध्ये आपण उत्तरार्थी क्र. ०४ असून, दि. १३/०१/२०२६ रोजी दुपारी १२.०० वाजता मा. अपर जिल्हाधिकारी तथा अपिलीय प्राधिकारी, मुंबई शहर यांचे दालनात सुनावणी आयोजित केलेली आहे. तरी सदर सुनावणीस आपण उपस्थित / हजर राहून, आपली बाजू मांडावी. उपरोक्त नमूद केलेल्या दिवशी आपण स्वतः अथवा आपले प्राधिकृत प्रतिनिधी उपस्थित न राहिल्यास, आपणास काहीही सांगावयाचे नाही, असे गृहित धरुन प्रकरणी गुणवत्तेवर निर्णय घेण्यात येईल, यांची नोंद घ्यावी.

कोर्टाचा शिक्का

**सहाय्यक्र महसुल अधिकारी अपर जिल्हाधिकारी**
**कार्यालय, मुंबई शहर**

## जाहीर नोटीस

**श्री. जयेश रमेश चौधरी - अपिलार्थी**

विरुध्द

सहायक आयुक्त महापालिका जी/दक्षिण विभाग व इतर ३

उत्तरार्थी

प्रति, श्री. चंद्रबली आर. सिंह ३२८६, वीर सुभाष नगर आनंद नगर, डॉ. ई. मोझेस रोड, वरळी, मुंबई-४०० ०१८

(उत्तरार्थी क्र. ४)

सदर जाहिर नोटीसी द्वारे आपणांस सुचित करण्यात येते की, अपिलार्थी यांनी महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मुलन व पुनर्विकास) अधिनियम, १९७१ मधील कलम ३५ अंतर्गत मा. अपर जिल्हाधिकारी तथा अपिलीय प्राधिकारी, मुंबई शहर, पहिला मजला, जुने जकात घर, शहिद भगतसिंग रोड, फोर्ट, मुंबई ४००००१ येथे वीर सुभाषनगर आनंदनगर को. ऑ.हौ. सोसा सहकारी गृहनिर्माण संस्थेच्या परि-II मध्ये स्वतःचे नाव समाविष्ट करून पात्र करणेकामी अपिलार्थी यांनी अपील अर्ज दाखल केला आहे.

प्रश्नांकित झोपडी / अपिलार्थी यांनी दावा केलेली झोपडी आपणाकडून खरेदी केल्याचे दिसून येत असल्याने सदर अपील प्रकरणात आपणांस उत्तरार्थी क्र. ०४ केले आहे. प्रकरणी दि. १५.१२.२०२५ रोजीचे सुनावणीमध्ये मा.अपर जिल्हाधिकारी तथा अपिलीय प्राधिकारी, मुंबई शहर यांनी आपणांस पुढील सुनावणी तारखेबाबत जाहिर नोटीसीद्वारे अवगत करणेचे निर्देश दिले आहेत.

सदर जाहिर नोटीसीद्वारे आपणांस सुचित करण्यात येते की, सदर प्रकरणामध्ये आपण उत्तरार्थी क्र. ०४ असून, दि. १३/०१/२०२६ रोजी दुपारी १२.०० वाजता मा.अपर जिल्हाधिकारी तथा अपिलीय प्राधिकारी, मुंबई शहर यांचे दालनात सुनावणी आयोजित केलेली आहे. तरी सदर सुनावणीस आपण उपस्थित / हजर राहून, आपली बाजू मांडावी. उपरोक्त नमूद केलेल्या दिवशी आपण स्वतः अथवा आपले प्राधिकृत प्रतिनिधी उपस्थित न राहिल्यास, आपणास काहीही सांगावयाचे नाही, असे गृहित धरुन प्रकरणी गुणवत्तेवर निर्णय घेण्यात येईल, यांची नोंद घ्यावी.

कोर्टाचा शिक्का

**सहाय्यक महसुल महसुल**
**अधिकारी अपर जिल्हाधिकारी कार्यालय, मुंबई**

## जाहीर नोटीस

**श्री. उमाशंकर जैसवार - अपिलार्थी**

विरुध्द

सहायक आयुक्त महापालिका जी/दक्षिण विभाग व इतर ३

उत्तरार्थी

प्रति,

श्री असगर अली नूर मोहम्मद कुरेशी माता रमाबाई आंबेडकरनगर को ऑप. हौ. सोसा वरळी मुंबई-४०० ०१८.

(उत्तरार्थी क्र. ४)

सदर जाहिर नोटीसीद्वारे आपणांस सुचित करण्यात येते की, अपिलार्थीयांनी महाराष्ट्रझोपडपट्टी (सुधारणा, निर्मुलन व पुनर्विकास) अधिनियम, १९७१ मधील कलम ३५ अंतर्गत मा. अपर जिल्हाधिकारी तथा अपिलीय प्राधिकारी, मुंबई शहर, पहिला मजला, जुने जकात घर, शहिद भगतसिंग रोड, फोर्ट, मुंबई ४००००१ येथे माता रमाबाई आंबेडकरनगर को.ऑ.हौ. सोसा सहकारी गृहनिर्माण संस्थेच्या परि-II मध्ये स्वतःचे नाव समाविष्ट करून पात्र करणेकामी अपिलार्थी यांनी अपील अर्ज दाखल केला आहे. प्रश्नांकित झोपडी / अपिलार्थी यांनी दावा केलेली झोपडी आपणाकडून खरेदी केल्याचे दिसून येत असल्याने सदर अपील प्रकरणात आपणांस उत्तरार्थी क्र. ०४ केले आहे. प्रकरणी दि. १५.१२.२०२५ रोजीचे सुनावणीमध्ये मा. अपर जिल्हाधिकारी तथा अपिलीय प्राधिकारी, मुंबई शहर यांनी आपणांस पुढील सुनावणी तारखेबाबत जाहिर नोटीसीद्वारे अवगत करणेचे निर्देश दिले आहेत.

सदर जाहिर नोटीसीद्वारे आपणांस सुचित करण्यात येते की, सदर प्रकरणामध्ये आपण उत्तरार्थी क्र. ०४ असून, दि. १३/०१/२०२६ रोजी दुपारी १२.०० वाजता मा.अपर जिल्हाधिकारी तथा अपिलीय प्राधिकारी, मुंबई शहर यांचे दालनात सुनावणी आयोजित केलेली आहे. तरी सदर सुनावणीस आपण उपस्थित / हजर राहून, आपली बाजू मांडावी. उपरोक्त नमूद केलेल्या दिवशी आपण स्वतः अथवा आपले प्राधिकृत प्रतिनिधी उपस्थित न राहिल्यास, आपणास काहीही सांगावयाचे नाही, असे गृहित धरुन प्रकरणी गुणवत्तेवर निर्णय घेण्यात येईल, यांची नोंद घ्यावी.

कोर्टाचा शिक्का

**सहाय्यक महसुल अधिकारी**
**अपर जिल्हाधिकारी कार्यालय, मुंबई शहर**

## जाहीर नोटीस

**श्री. रोहित जनार्दन शिंदे - अपिलार्थी**

विरुध्द

सहायक आयुक्त महापालिका जी/दक्षिण विभाग व इतर २

- उत्तरार्थी

प्रति, जानकी सखाराम कुलये रा.३६६७, आनंदनगर को.ऑप. हौ. सोसायटी डॉ.ई. मोझेस रोड, मुंबई-४०० ०१८

(उत्तरार्थी क्र. ३)

सदर जाहिर नोटीसी द्वारे आपणांस सुचित करण्यात येते की, अपिलार्थी यांनी महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मुलन व पुनर्विकास) अधिनियम, १९७१ मधील कलम ३५ अंतर्गत मा.अपर जिल्हाधिकारी तथा अपिलीय प्राधिकारी, मुंबई शहर, पहिला मजला, जुने जकात घर, शहिद भगतसिंग रोड, फोर्ट, मुंबई ४००००१ येथे आनंदनगर को.ऑ. हौ. सोसा सहकारी गृहनिर्माण संस्थेच्या परि-II मध्ये स्वतःचे नाव समाविष्ट करून पात्र करणेकामी अपिलार्थी यांनी अपील अर्ज दाखल केला आहे.

प्रश्नांकित झोपडी / अपिलार्थी यांनी दावा केलेली झोपडी आपणाकडून खरेदी केल्याचे दिसून येत असल्याने सदर अपील प्रकरणात आपणांस उत्तरार्थी क्र. ०३ केले आहे. प्रकरणी दि. १५.१२.२०२५ रोजीचे सुनावणीमध्ये मा.अपर जिल्हाधिकारी तथा अपिलीय प्राधिकारी, मुंबई शहर यांनी आपणांस पुढील सुनावणी तारखेबाबत जाहिर नोटीसीद्वारे अवगत करणेचे निर्देश दिले आहेत.

सदर जाहिर नोटीसीद्वारे आपणांस सुचित करण्यात येते की, सदर प्रकरणामध्ये आपण उत्तरार्थी क्र. ०४ असून, दि. १३/०१/२०२६ रोजी दुपारी १२.०० वाजता मा.अपर जिल्हाधिकारी तथा अपिलीय प्राधिकारी, मुंबई शहर यांचे दालनात सुनावणी आयोजित केलेली आहे. तरी सदर सुनावणीस आपण उपस्थित / हजर राहून, आपली बाजू मांडावी. उपरोक्त नमूद केलेल्या दिवशी आपण स्वतः अथवा आपले प्राधिकृत प्रतिनिधी उपस्थित न राहिल्यास, आपणास काहीही सांगावयाचे नाही, असे गृहित धरुन प्रकरणी गुणवत्तेवर निर्णय घेण्यात येईल, यांची नोंद घ्यावी.

कोर्टाचा शिक्का

**सहाय्यक महसूल अधिकारी**
**अपर जिल्हाधिकारी कार्यालय, मुंबई शहर**

## जाहीर नोटीस

**वैष्णवी विष्णू चोगले - अपिलार्थी**

विरुध्द

सहायक आयुक्त महापालिका जी/दक्षिण विभाग व इतर ३

उत्तरार्थी

प्रति,

सरजू इबरान जैसवार आनंदनगर को.ऑप. हौ. सोसायटी

डॉ. ई. मोझेस रोड, मुंबई-४०० ०१८

(उत्तरार्थी क्र. ४)

सदर जाहिर नोटीसी द्वारे आपणांस सुचित करण्यात येते की, अपिलार्थी यांनी महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मुलन व पुनर्विकास) अधिनियम, १९७१ मधील कलम ३५ अंतर्गत मा. अपर जिल्हाधिकारी तथा अपिलीय प्राधिकारी, मुंबई शहर, पहिला मजला, जुने जकात घर, शहिद भगतसिंग रोड, फोर्ट, मुंबई ४००००१ येथे आनंदनगर को. ऑ.हौ. सोसा सहकारी गृहनिर्माण संस्थेच्या परि-II मध्ये स्वतःचे नाव समाविष्ट करून पात्र करणेकामी अपिलार्थी यांनी अपील अर्ज दाखल केला आहे. प्रश्नांकित झोपडी / अपिलार्थी यांनी दावा केलेली झोपडी आपणाकडून खरेदी केल्याचे दिसून येत असल्याने सदर अपील प्रकरणात आपणांस उत्तरार्थी क्र. ०४ केले आहे. प्रकरणी दि. १५.१२.२०२५ रोजीचे सुनावणीमध्ये मा. अपर जिल्हाधिकारी तथा अपिलीय प्राधिकारी, मुंबई शहर यांनी आपणांस पुढील सुनावणी तारखेबाबत जाहिर नोटीसीद्वारे अवगत करणेचे निर्देश दिले आहेत.सदर जाहिर नोटीसीद्वारे आपणांस सुचित करण्यात येते की, सदर प्रकरणामध्ये आपण उत्तरार्थी क्र. ०४ असून, दि. १३/०१/२०२६ रोजी दुपारी १२.०० वाजता मा.अपर जिल्हाधिकारी तथा अपिलीय प्राधिकारी, मुंबई शहर यांचे दालनात सुनावणी आयोजित केलेली आहे. तरी सदर सुनावणीस आपण उपस्थित / हजर राहून, आपली बाजू मांडावी. उपरोक्त नमूद केलेल्या दिवशी आपण स्वतः अथवा आपले प्राधिकृत प्रतिनिधी उपस्थित न राहिल्यास, आपणास काहीही सांगावयाचे नाही, असे गृहित धरुन प्रकरणी गुणवत्तेवर निर्णय घेण्यात येईल, यांची नोंद घ्यावी.

कोर्टाचा शिक्का

**सहाय्यक महसुल अधिकारी**
**अपर जिल्हाधिकारी कार्यालय, मुंबई शहर**

## जाहीर नोटीस

**श्री. हर्ष सुभाष गौतम - अपिलार्थी**

विरुध्द

सहायक आयुक्त महापालिका जी/दक्षिण विभाग व इतर ३

उत्तरार्थी

प्रति,

जयस्वार संतलाल बरसाती आनंदनगर को ऑप सौसा. लिमिटेड वरळी मुंबई-४०० ०१८.

(उत्तरार्थी क्र. ४)

सदर जाहिर नोटीसीद्वारे आपणांस सुचित करण्यात येते की, अपिलार्थीयांनी महाराष्ट्रझोपडपट्टी (सुधारणा, निर्मुलन व पुनर्विकास) अधिनियम, १९७१ मधील कलम ३५ अंतर्गत मा. अपर जिल्हाधिकारी तथा अपिलीय प्राधिकारी, मुंबई शहर, पहिला मजला, जुने जकात घर, शहिद भगतसिंग रोड, फोर्ट, मुंबई ४००००१ येथे आनंदनगर को. ऑ. हौ. सोसा सहकारी गृहनिर्माण संस्थेच्या परि-II मध्ये स्वतःचे नाव समाविष्ट करून पात्र करणेकामी अपिलार्थी यांनी अपील अर्ज दाखल केला आहे. प्रश्नांकित झोपडी / अपिलार्थी यांनी दावा केलेली झोपडी आपणाकडून खरेदी केल्याचे दिसून येत असल्याने सदर अपील प्रकरणात आपणांस उत्तरार्थी क्र. ०४ केले आहे. प्रकरणी दि. १५.१२.२०२५ रोजीचे सुनावणीमध्ये मा.अपर जिल्हाधिकारी तथा अपिलीय प्राधिकारी, मुंबई शहर यांनी आपणांस पुढील सुनावणी तारखेबाबत जाहिर नोटीसीद्वारे अवगत करणेचे निर्देश दिले आहेत.

सदर जाहिर नोटीसीद्वारे आपणांस सुचित करण्यात येते की, सदर प्रकरणामध्ये आपण उत्तरार्थी क्र. ०४ असून, दि. १३/०१/२०२६ रोजी दुपारी १२.०० वाजता मा.अपर जिल्हाधिकारी तथा अपिलीय प्राधिकारी, मुंबई शहर यांचे दालनात सुनावणी आयोजित केलेली आहे. तरी सदर सुनावणीस आपण उपस्थित / हजर राहून, आपली बाजू मांडावी. उपरोक्त नमूद केलेल्या दिवशी आपण स्वतः अथवा आपले प्राधिकृत प्रतिनिधी उपस्थित न राहिल्यास, आपणास काहीही सांगावयाचे नाही, असे गृहित धरुन प्रकरणी गुणवत्तेवर निर्णय घेण्यात येईल, यांची नोंद घ्यावी.

कोर्टाचा शिक्का

**सहाय्यक महसुल अधिकारी**
**अपर जिल्हाधिकारी कार्यालय, मुंबई शहर**

## सार्वजनिक सूचना

**विषय:** मुंबई महानगरपालिका निवासस्थान हस्तांतरण श्री. नंदकुमार गंगाराम खळे यांचे कायदेशीर वारस / दावेदार यांना सूचना

**सर्व संबंधितांना सूचित करण्यात येते की:**

श्री. नंदकुमार गंगाराम खळे, पुत्र गंगाराम खळे, मूळ भाडेकरू, मुंबई महानगरपालिका निवासस्थान: ८० टेनामेंट्स, चाळ क्रमांक ३, खोली क्रमांक ७, नेहरू नगर, गणपतराव कदम मार्ग, वरळी, मुंबई- ४०००१८, यांनी दिनांक ०२/०९/२०१८ रोजी सदर निवासस्थानाचे भाडेकरू हक्क श्री. अमीन खान यांना हस्तांतरित केले आहेत.

हस्तांतरणाच्या वेळी श्री. नंदकुमार गंगाराम खळे अविवाहित होते आणि त्यांना कोणतीही मुले / वारस नव्हते.

श्री. अमीन खान वर्ष २०१८ पासून सतत ताब्यात आहेत आणि औपचारिक हस्तांतरणासाठी अर्ज सादर केला आहे.

**सूचना:**

श्री. नंदकुमार गंगाराम खळे यांचे कायदेशीर वारस किंवा सदर निवासस्थानावर कोणताही हक्क / दावा/ आक्षेप असणाऱ्या व्यक्तींनी या सूचनेच्या प्रसिद्धीपासून १५ दिवसांत योग्य पुराव्यासह खालील पत्त्यांवर प्रतिसाद द्यावा:

१. मालमत्ता अधिकारी, जी/दक्षिण प्रभाग, बृहन्मुंबई महानगरपालिका,

मुंबई - ४०००१३.

२. श्री. अमीन खान, ८० टेनामेंट्स, चाळ क्रमांक ३, खोली क्रमांक ७, नेहरू नगर, एस.एस. अमृतवार मार्ग, वरळी, मुंबई ४०००१८. मोबाईल: ७७१०९६३१६३

१५ दिवसांत प्रतिसाद न मिळाल्यास: कोणतेही वारस / दावे नाहीत असे गृहित धरून हस्तांतरण प्रक्रिया पुढे चालू राहील. भविष्यातील दावे फेटाळले जातील.

**जारीकर्ता: श्री. अमीन खान**
**मोबाईल: ७७१०९६३१६३**
**दिनांक: ०८/०१/२०२६**

कोर्टाचा शिक्का

**कायदेशीर सल्लागार: ॲड. वेंकटेश देवेंद्र**

## जाहीर नोटीस

**श्री. नितीन सखाराम नागप**

अपिलार्थी

विरुध्द

सहायक आयुक्त महापालिका जी/दक्षिण विभाग व इतर ३

उत्तरार्थी

प्रति,

सुनंदा बालकृष्ण कोंडविलकर आनंदनगर को. ऑप. हौ. सोसायटी डॉ.ई. मोझेस रोड, मुंबई-४०० ०१८

(उत्तरार्थी क्र. ४)

सदर जाहिर नोटीसी द्वारे आपणांस सुचित करण्यात येते की, अपिलार्थी यांनी महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मुलन व पुनर्विकास) अधिनियम, १९७१ मधील कलम ३५ अंतर्गत मा.अपर जिल्हाधिकारी तथा अपिलीय प्राधिकारी, मुंबई शहर, पहिला मजला, जुने जकात घर, शहिद भगतसिंग रोड, फोर्ट, मुंबई ४००००१ येथे आनंदनगर को. ऑ.हौ. सोसा सहकारी गृहनिर्माण संस्थेच्या परि-II मध्ये स्वतःचे नाव समाविष्ट करून पात्र करणेकामी अपिलार्थी यांनी अपील अर्ज दाखल केला आहे. प्रश्नांकित झोपडी / अपिलार्थी यांनी दावा केलेली झोपडी आपणाकडून खरेदी केल्याचे दिसून येत असल्याने सदर अपील प्रकरणात आपणांस उत्तरार्थी क्र. ०४ केले आहे. प्रकरणी दि. १५.१२.२०२५ रोजीचे सुनावणीमध्ये मा. अपर जिल्हाधिकारी तथा अपिलीय प्राधिकारी, मुंबई शहर यांनी आपणांस पुढील सुनावणी तारखेबाबत जाहिर नोटीसीद्वारे अवगत करणेचे निर्देश दिले आहेत.सदर जाहिर नोटीसीद्वारे आपणांस सुचित करण्यात येते की, सदर प्रकरणामध्ये आपण उत्तरार्थी क्र. ०४ असून, दि. १३/०१/२०२६ रोजी दुपारी १२.०० वाजता मा. अपर जिल्हाधिकारी तथा अपिलीय प्राधिकारी, मुंबई शहर यांचे दालनात सुनावणी आयोजित केलेली आहे. तरी सदर सुनावणीस आपण उपस्थित / हजर राहून, आपली बाजू मांडावी. उपरोक्त नमूद केलेल्या दिवशी आपण स्वतः अथवा आपले प्राधिकृत प्रतिनिधी उपस्थित न राहिल्यास, आपणास काहीही सांगावयाचे नाही, असे गृहित धरुन प्रकरणी गुणवत्तेवर निर्णय घेण्यात येईल, यांची नोंद घ्यावी.

कोर्टाचा शिक्का

**सहाय्युक्त महसुल अधिकारी अपर जिल्हाधिकारी**
**कार्यालय, मुंबई शहर**

## जाहीर नोटीस

**श्री. प्रकाश बाबु गुरव - अपिलार्थी**

विरुध्द

सहायक आयुक्त महापालिका जी/दक्षिण विभाग व इतर ३

- उत्तरार्थी

प्रति, कल्लुरी नरसय्या लिंगय्या आनंदनगर को.ऑप. हौ. सोसायटी डॉ. ई. मोझेस रोड, मुंबई-४०० ०१८

(उत्तरार्थी क्र. ४)

सदर जाहिर नोटीसी द्वारे आपणांस सुचित करण्यात येते की, अपिलार्थी यांनी महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मुलन व पुनर्विकास) अधिनियम, १९७१ मधील कलम ३५ अंतर्गत मा. अपर जिल्हाधिकारी तथा अपिलीय प्राधिकारी, मुंबई शहर, पहिला मजला, जुने जकात घर, शहिद भगतसिंग रोड, फोर्ट, मुंबई ४००००१ येथे आनंदनगर को. ऑ. हौ. सोसा सहकारी गृहनिर्माण संस्थेच्या परि-II मध्ये स्वतःचे नाव समाविष्ट करून पात्र करणेकामी अपिलार्थी यांनी अपील अर्ज दाखल केला आहे. प्रश्नांकित झोपडी / अपिलार्थी यांनी दावा केलेली झोपडी आपणाकडून खरेदी केल्याचे दिसून येत असल्याने सदर अपील प्रकरणात आपणांस उत्तरार्थी क्र. ०४ केले आहे. प्रकरणी दि. १५.१२.२०२५ रोजीचे सुनावणीमध्ये मा.अपर जिल्हाधिकारी तथा अपिलीय प्राधिकारी, मुंबई शहर यांनी आपणांस पुढील सुनावणी तारखेबाबत जाहिर नोटीसीद्वारे अवगत करणेचे निर्देश दिले आहेत.

सदर जाहिर नोटीसीद्वारे आपणांस सुचित करण्यात येते की, सदर प्रकरणामध्ये आपण उत्तरार्थी क्र. ०४ असून, दि. १३/०१/२०२६ रोजी दुपारी १२.०० वाजता मा. अपर जिल्हाधिकारी तथा अपिलीय प्राधिकारी, मुंबई शहर यांचे दालनात सुनावणी आयोजित केलेली आहे. तरी सदर सुनावणीस आपण उपस्थित / हजर राहून, आपली बाजू मांडावी. उपरोक्त नमूद केलेल्या दिवशी आपण स्वतः अथवा आपले प्राधिकृत प्रतिनिधी उपस्थित न राहिल्यास, आपणास काहीही सांगावयाचे नाही, असे गृहित धरुन प्रकरणी गुणवत्तेवर निर्णय घेण्यात येईल, यांची नोंद घ्यावी.

कोर्टाचा शिक्का

**सहाय्यक महसुल अधिकारी अपर जिल्हाधिकारी**
**कार्यालय, मुंबई शहर**

## जाहीर नोटीस

**रुपाली राजाराम मालुसरे अपिलार्थी**

विरुध्द

सहायक आयुक्त महापालिका जी/दक्षिण विभाग व इतर ३

उत्तरार्थी

प्रति,

रंजना तानाजी माने आनंद नगर, को.ऑप. हौ. सोसा डॉ.ई. मोझेस रोड, वरळी मुंबई-४००

(उत्तरार्थी क्र. ४)

सदर जाहिर नोटीसी द्वारे आपणांस सुचित करण्यात येते की, अपिलार्थी यांनी महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मुलन व पुनर्विकास) अधिनियम, १९७१ मधील कलम ३५ अंतर्गत मा. अपर जिल्हाधिकारी तथा अपिलीय प्राधिकारी, मुंबई शहर, पहिला मजला, जुने जकात घर, शहिद भगतसिंग रोड, फोर्ट, मुंबई ४००००१ येथे आनंदनगर को. ऑ.हौ. सोसा सहकारी गृहनिर्माण संस्थेच्या परि-II मध्ये स्वतःचे नाव समाविष्ट करून पात्र करणेकामी अपिलार्थी यांनी अपील अर्ज दाखल केला आहे. प्रश्नांकित झोपडी / अपिलार्थी यांनी दावा केलेली झोपडी आपणाकडून खरेदी केल्याचे दिसून येत असल्याने सदर अपील प्रकरणात आपणांस उत्तरार्थी क्र. ०४ केले आहे. प्रकरणी दि. १५.१२.२०२५ रोजीचे सुनावणीमध्ये मा.अपर जिल्हाधिकारी तथा अपिलीय प्राधिकारी, मुंबई शहर यांनी आपणांस पुढील सुनावणी तारखेबाबत जाहिर नोटीसीद्वारे अवगत करणेचे निर्देश दिले आहेत.

सदर जाहिर नोटीसीद्वारे आपणांस सुचित करण्यात येते की, सदर प्रकरणामध्ये आपण उत्तरार्थी क्र. ०४ असून, दि. १३/०१/२०२६ रोजी दुपारी १२.०० वाजता मा.अपर जिल्हाधिकारी तथा अपिलीय प्राधिकारी, मुंबई शहर यांचे दालनात सुनावणी आयोजित केलेली आहे. तरी सदर सुनावणीस आपण उपस्थित / हजर राहून, आपली बाजू मांडावी. उपरोक्त नमूद केलेल्या दिवशी आपण स्वतः अथवा आपले प्राधिकृत प्रतिनिधी उपस्थित न राहिल्यास, आपणास काहीही सांगावयाचे नाही, असे गृहित धरुन प्रकरणी गुणवत्तेवर निर्णय घेण्यात येईल, यांची नोंद घ्यावी.

कोर्टाचा शिक्का

**सहाय्यक महसुल अधिकारी अपर जिल्हाधिकारी**
**कार्यालय, मुंबई शहर**

## जाहीर नोटीस

**श्री. अंजली अशोक चोगले - अपिलार्थी**

विरुध्द

सहायक आयुक्त महापालिका जी/दक्षिण विभाग व इतर ३

उत्तरार्थी

प्रति,

हरी सखाराम चिपळूणकर आनंदनगर को ऑप सौसा. लिमिटेड वरळी मुंबई-४०० ०१८.

(उत्तरार्थी क्र. ४)

सदर जाहिर नोटीसीद्वारे आपणांस सुचित करण्यात येते की, अपिलार्थीयांनी महाराष्ट्रझोपडपट्टी (सुधारणा, निर्मुलन व पुनर्विकास) अधिनियम, १९७१ मधील कलम ३५ अंतर्गत मा.अपर जिल्हाधिकारी तथा अपिलीय प्राधिकारी, मुंबई शहर, पहिला मजला, जुने जकात घर, शहिद भगतसिंग रोड, फोर्ट, मुंबई ४००००१ येथे आनंदनगर को.ऑ.हौ. सोसा सहकारी गृहनिर्माण संस्थेच्या परि-II मध्ये स्वतःचे नाव समाविष्ट करून पात्र करणेकामी अपिलार्थी यांनी अपील अर्ज दाखल केला आहे. प्रश्नांकित झोपडी / अपिलार्थी यांनी दावा केलेली झोपडी आपणाकडून खरेदी केल्याचे दिसून येत असल्याने सदर अपील प्रकरणात आपणांस उत्तरार्थी क्र. ०४ केले आहे. प्रकरणी दि. १५.१२.२०२५ रोजीचे सुनावणीमध्ये मा.अपर जिल्हाधिकारी तथा अपिलीय प्राधिकारी, मुंबई शहर यांनी आपणांस पुढील सुनावणी तारखेबाबत जाहिर नोटीसीद्वारे अवगत करणेचे निर्देश दिले आहेत.

सदर जाहिर नोटीसीद्वारे आपणांस सुचित करण्यात येते की, सदर प्रकरणामध्ये आपण उत्तरार्थी क्र. ०४ असून, दि. १३/०१/२०२६ रोजी दुपारी १२.०० वाजता मा.अपर जिल्हाधिकारी तथा अपिलीय प्राधिकारी, मुंबई शहर यांचे दालनात सुनावणी आयोजित केलेली आहे. तरी सदर सुनावणीस आपण उपस्थित / हजर राहून, आपली बाजू मांडावी. उपरोक्त नमूद केलेल्या दिवशी आपण स्वतः अथवा आपले प्राधिकृत प्रतिनिधी उपस्थित न राहिल्यास, आपणास काहीही सांगावयाचे नाही, असे गृहित धरुन प्रकरणी गुणवत्तेवर निर्णय घेण्यात येईल, यांची नोंद घ्यावी.

कोर्टाचा शिक्का

**सहाय्यक महसुल अधिकारी अपर जिल्हाधिकारी**
**कार्यालय, मुंबई शहर**

## जाहीर नोटीस

**श्री. जयेश जयवंत म्हसकर - अपिलार्थी**

विरुध्द

सहायक आयुक्त महापालिका जी/दक्षिण विभाग व इतर ३

- उत्तरार्थी

प्रति,

गोविंद बाबू सावर्डेकर आनंदनगर को ऑप सौसा. लिमिटेड वरळी मुंबई-४०० ०१८.

(उत्तरार्थी क्र. ४)

सदर जाहिर नोटीसीद्वारे आपणांस सुचित करण्यात येते की, अपिलार्थीयांनी महाराष्ट्रझोपडपट्टी (सुधारणा, निर्मुलन व पुनर्विकास) अधिनियम, १९७१ मधील कलम ३५ अंतर्गत मा. अपर जिल्हाधिकारी तथा अपिलीय प्राधिकारी, मुंबई शहर, पहिला मजला, जुने जकात घर, शहिद भगतसिंग रोड, फोर्ट, मुंबई ४००००१ येथे आनंदनगर को. ऑ.हौ. सोसा सहकारी गृहनिर्माण संस्थेच्या परि-II मध्ये स्वतःचे नाव समाविष्ट करून पात्र करणेकामी अपिलार्थी यांनी अपील अर्ज दाखल केला आहे. प्रश्नांकित झोपडी / अपिलार्थी यांनी दावा केलेली झोपडी आपणाकडून खरेदी केल्याचे दिसून येत असल्याने सदर अपील प्रकरणात आपणांस उत्तरार्थी क्र. ०४ केले आहे. प्रकरणी दि. १५.१२.२०२५ रोजीचे सुनावणीमध्ये मा.अपर जिल्हाधिकारी तथा अपिलीय प्राधिकारी, मुंबई शहर यांनी आपणांस पुढील सुनावणी तारखेबाबत जाहिर नोटीसीद्वारे अवगत करणेचे निर्देश दिले आहेत.

सदर जाहिर नोटीसीद्वारे आपणांस सुचित करण्यात येते की, सदर प्रकरणामध्ये आपण उत्तरार्थी क्र. ०४ असून, दि. १३/०१/२०२६ रोजी दुपारी १२.०० वाजता मा.अपर जिल्हाधिकारी तथा अपिलीय प्राधिकारी, मुंबई शहर यांचे दालनात सुनावणी आयोजित केलेली आहे. तरी सदर सुनावणीस आपण उपस्थित / हजर राहून, आपली बाजू मांडावी. उपरोक्त नमूद केलेल्या दिवशी आपण स्वतः अथवा आपले प्राधिकृत प्रतिनिधी उपस्थित न राहिल्यास, आपणास काहीही सांगावयाचे नाही, असे गृहित धरुन प्रकरणी गुणवत्तेवर निर्णय घेण्यात येईल, यांची नोंद घ्यावी.

कोर्टाचा शिक्का

**सहाय्यक महसुल अधिकारी**
**अपर जिल्हाधिकारी कार्यालय, मुंबई शह**


## मा नगरसेवक राजू सोनी यांच्या तत्परतेमुळे कबुतराला मिळाले जीवदान

**दैनिक युवक आधार**

**पनवेल वार्ताहर :** पनवेल महापालिकेचे मा नगरसेवक राजू सोनी यांच्या तत्परतेमुळे कबुतराला जीवदान मिळाले आहे.

शहरातील झवेरी बाजार येथील महावितरण कंपनीच्या हाय टेन्शन वर एक कबूतर अडकला आहे याची माहिती येथील व्यापारी व नागरिकांनी मा. नगरसेवक राजू सोनी यांना फोन द्वारे कळवली त्यांनी तात्काळ तेथे धाव घेऊन तेथे त्यांचे स्वीय्य सहाय्यक मंदार देसाई यांना बोलवून तेथे अग्निशमन दल व महावितरण कर्मचारी यांना बोलवण्यास सांगितले. देसाई यांनी लगेचच अग्निशामक दल व महावितरण कंपनीचे अधिकारी व कर्मचारी यांना बोलवले.

महावितरण कंपनीचे कर्मचारी येऊन जिवाची पर्वा न करता हाय टेन्शन वर चढून



तात्काळ त्या लटकलेल्या कबुतराचे सुखरूप प्राण वाचवले व त्याला सोडण्यात आले. त्या मुळे येथील नागरिकांनी राजू सोनी , मंदार देसाई व महावितरण कर्मचारी यांचे कौतुक करून आभार मानले.

# मंत्री आदिती तटकरे यांच्या हस्ते म्हसळा तालुक्यात विविध विकासकामांचे उद्‌घाटन व भूमिपूजन संपन्न

**दैनिक युवक आधार**

**म्हसळा | प्रतिनिधी प्रा.शिरीष समेळ :** म्हसळा तालुक्याच्या सर्वांगीण विकासासाठी राज्य शासन कटिबद्ध असून ग्रामीण भागातील मूलभूत सुविधा अधिक सक्षम करण्यासाठी मा.खासदार सुनिल तटकरे आणि माजी आमदार अनिकेत तटकरे यांच्या माध्यमातून महाराष्ट्र शासनातर्फे भरीव निधी उपलब्ध करून दिला जात आहे, असे प्रतिपादन महाराष्ट्र राज्याच्या महिला व बालविकास मंत्री तथा राज्य कॅबिनेट मंत्री नाम. कु. आदिती ताई वरदा सुनिल तटकरे यांनी केले. म्हसळा तालुक्यात विविध विकासकामांचे उद्घाटन व भूमिपूजन सोहळे त्यांच्या शुभहस्ते उत्साहात पार पडले.

मंत्री आदिती तटकरे यांच्या म्हसळा तालुक्यातील दौऱ्याची सुरुवात सकाळी ११ वाजता कांदळवाडा गाव बैठकीने झाली.



या बैठकीत ग्रामस्थांच्या समस्या, पाणीपुरवठा, रस्ते, आरोग्य, शिक्षण तसेच महिलांच्या प्रश्नांवर सविस्तर चर्चा करण्यात आली. त्यानंतर निगडी ,गायरानेआणि चिचोंडे येथे गाव बैठका घेण्यात आल्या.तदनंतर ग्रामस्थांच्या सामाजिक, सांस्कृतिक व सार्वजनिक कार्यक्रमांसाठी आणि सामाजिक व पायाभूत सुविधांना चालना देण्यासाठी उपयुक्त ठरणा-या विठ्ठलवाडी येथील सामाजिक सभागृहाच्या भूमिपूजनाचा कार्यक्रम पार पडला.दुपारी २.०० वाजता पाभरे येथे रस्त्याचे भूमिपूजन, सभा मंडपाचे भूमिपूजन तसेच कमानी गेटचे भूमिपूजन करण्यात आले. ग्रामीण दळणवळण सुलभ होण्यासाठी रस्त्यांची गुणवत्ता सुधारण्यावर शासनाचा विशेष भर असल्याचे मंत्री तटकरे यांनी यावेळी स्पष्ट केले. दुपारी २.३० वाजता स्वारगाव बुद्रुक येथे नव्याने पूर्ण झालेल्या रस्त्याचे उद्घाटन मंत्री आदिती तटकरे यांच्या हस्ते झाले. या रस्त्यामुळे शेतकरी, विद्यार्थी व व्यापाऱ्यांना मोठा दिलासा मिळणार आहे. त्यानंतर सुरई चिरगाव ढोरजे,घोणसे गावात बैठक घेऊन स्थानिक विकासकामांचा आढावा घेण्यात आला.

सायंकाळी चिरगाव सरक्याची वाडी येथे सामाजिक सभागृहाचे भूमिपूजन करण्यात आले. या सभागृहामुळे गावातील विविध उपक्रमांना हक्काचे व्यासपीठ मिळणार आहे. त्यानंतर ढोरजे व घोणसे येथे गाव बैठका घेण्यात आल्या. या बैठकीत ग्रामस्थांनी मांडलेल्या समस्या मंत्री तटकरे यांनी तत्काळ नोंद घेऊन संबंधित अधिकाऱ्यांना मार्गदर्शन केले

या संपूर्ण दौऱ्यात तहसीलदार सचिन खाडे, तालुकाध्यक्ष समीर बनकर,तालुक्यातील मा. सभापती, उपसभापती, जिल्हा सभापती, जिल्हा परिषद सदस्य, पंचायत समिती सदस्य, जिल्हा चिटणीस, महिला जिल्हा चिटणीस, श्रीवर्धन मतदारसंघाचे उपाध्यक्ष, विभागीय (गण) अध्यक्ष, महिला व युवा तालुका अध्यक्ष, म्हसळा शहर व उपनगर अध्यक्ष, नगरसेवक व नगरसेविका, विविध सेलचे तालुका पदाधिकारी, महिला व विद्यार्थी संघटनांचे प्रतिनिधी, आजी-माजी लोकप्रतिनिधी, सरपंच, उपसरपंच, ग्रामपंचायत सदस्य तसेच राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. मंत्री आदिती तटकरे यांनी आपल्या भाषणात म्हसळा तालुक्याच्या विकासासाठी भविष्यातही निधीची कमतरता भासू दिली जाणार नाही, असे स्पष्ट केले.

ग्रामीण भागातील महिला, बालक, शेतकरी आणि युवकांसाठी विविध योजनांच्या माध्यमातून विकासाची गती अधिक वेगाने वाढवली जाईल, असेही त्यांनी सांगितले.या दौऱ्यात पार पडलेल्या उद्घाटन व भूमिपूजन कार्यक्रमांमुळे म्हसळा तालुक्यातील विकासाला नवी दिशा मिळाल्याची भावना ग्रामस्थ व कार्यकर्त्यांनी व्यक्त केली.

# आंबेडकरी जनतेच्या पाठिंब्यामुळेच मुंबईत महायुतीचा महापौर होईल - केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवले

**दैनिक युवक आधार**

**मुंबई / प्रतिनिधी :** आंबेडकरी जनतेच्या भिम नगरामुळे मी केंद्रात मंत्रीपदापर्यंत पोहचलो आहे. आंबेडकरी जनतेची भिमशक्ती माझ्याकडे असल्यामुळे, मी ज्यांच्यासोबत जातो त्यांची सत्ता येते. मुंबईत सुध्दा आंबेडकरी जनतेच्या पाठिंब्यामुळे महायुतीचा महापौर होईल असे प्रतिपादन रिपब्लिकन पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री ना. रामदास आठवले यांनी केले. घाटकोपर, भिमनगर येथे महायुती च्या उमेदवार सौ.अलका भगत यांच्या जाहीर प्रचारसभेत ना. रामदास आठवले बोलत होते.

यावेळी यावेळी स्थानिक आमदार राम कदम; रिपब्लिकन पक्षाचे राज्य सरचिटणीस गौतम सोनवणे, महायुतीच्या अधिकृत उमेदवार सौ. अलका गणेश भगत, कुमार जीत आठवले, कुमार ओम



राम कदम, गणेश भगत, हेमंत रणपिसे, भाजपच्या नेत्या सुनिता पंदिरकर आदि मान्यंवर उपस्थित होते.

घाटकोपर पश्चिमेतील भिमनगर चौकात महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा पुतळा उभारण्यात येणार आहे. तसेच घाटकोपरमध्ये शिवसृष्टी आणि भिमसृष्टी सुध्दा आमदार राम कदम उभारणार आहेत. घाटकोपरमधील झोपडपट्टयांचा पुर्नविकास, घाटकोपरमधील रस्त्यांचा विकास, आणि ट्रफिक जामवरील उपाय म्हणून सिग्नल आणि रस्त्यांचे रुंदीकरण करुन आदि अनेक विकास कामे घाटकोपरमध्ये करण्यात येणार आहेत. आणि त्यासाठी विकासाचा दुरदृष्टीकोन असणा-या महायुतीच्या भाजप, शिवसेना, रिपाइंच्या उमेदवारांना निवडुन दिले पाहिजे.

एस.आर.ए. मध्ये झोपडपट्टीच्या मिळणारे घर हे ३०० फुटाचे देवून चालणार नाही. तर यापुढे झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणातर्फे किमान ४५० चौ.फुटाचे घर झोपडपट्टीवासीयांना दिले पाहिजे. त्यासाठी आपण प्रयत्न करणार असल्याचे ना. रामदास आठवले म्हणाले.

भिमनगरमधील जनतेच्या पाठिंब्यामुळेच मी माझा राजकीय प्रवास दिल्लीपर्यंत करु शकलो. महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा रिपब्लिकन पक्ष मी देशभर घेवुन जात आहे. देशातील २८ राज्य आणि ८ केंद्रशासीत प्रदेशात रिपब्लिकन पक्षाचा निळा झेंडा फडकत आहे. नागालँड आणि मणिपुर या राज्यांमध्ये रिपब्लिकन पक्षाला मान्यता मिळालेली आहे. आणखी २ राज्यांत रिपब्लिकन पक्षाला निवडणुक आयोगाची मान्यता मिळाल्यास रिपब्लिकन पक्ष हा राष्ट्रीय पक्ष म्हणून मान्यता प्राप्त होईल. देशात भाजप, कॉंग्रेस, बसपा आणि आम आदमी पार्टी हे चार पक्ष राष्ट्रीय पक्ष आहेत. यापुढे लवकरच माझा रिपब्लिकन पक्ष सुध्दा राष्ट्रीय पक्ष म्हणून मान्यता प्राप्त होईल. त्या दृष्टीने माझे काम सुरु आहे. माझा रिपब्लिकन पक्ष हा बाबासाहेब आंबेडकरांचा आणि आंबेडकरी जनतेचा आहे. रिपब्लिकन पक्षाकडे आम्ही सर्व जाती धर्मांना सोबत घेवुन चाललो आहे.

शिवसेना प्रमुख दिवंगत बाळासाहेब ठाकरे यांनी आयुष्यभर कॉंग्रेस पक्षाला विरोध केला. मात्र त्यांचे सुपुत्र उध्दव ठाकरे यांनी कॉंग्रेस सोबतच युती केली. मी कॉंग्रेसला सोडुन भाजप शिवसेनेसोबत येवुन शिवशक्ती - भिमशक्ती केली होती. त्यामुळे मी अनेकदा उध्दव ठाकरेंना सांगितले की, तुम्ही कॉंग्रेससोबत जावु नका, मात्र ते कॉंग्रेस सोबत गेले. आणि आता राज ठाकरे बरोबर सुध्दा उध्दवजी ठाकरे गेले आहेत. त्यामुळे त्यांचा कोणताही फायदा होणार नाही. या मुंबई महानगरपालिका निवडणुकीत उबाठाची मशाल पेटणार नाही तर ती विझणार आहे असाही टोला ना. रामदास आठवले म्हणाले.

मुंबईतील झोपडीवासीयांच्या पाठीशी रिपब्लिकन पक्ष नेहमी उभा राहिलेला आहे.२०२० पर्यंत झोपडपट्टयांना शासनाकडुन कायदेशीर मान्यता मिळाली पाहिजे, ही रिपब्लिकन पक्षाची मागणी आहे. त्यासाठी महायुतीच्या उमेदवारांना विजयी करा असे आवाहन ना. रामदास आठवले यांनी केले. ना. रामदास आठवले यांनी घाटकोपर, भांडुप, पवई, तसेच वरळी आदि अनेक भागात महायुतींच्या उमेदवारांचा प्रचार केला.

## ज्येष्ठ नागरिक दत्तात्रेय साठे यांचे निधन

**दैनिक युवक आधार**

**पनवेल (प्रतिनिधी) :** गुळसुंदे येथील ज्येष्ठ नागरिक दत्तात्रेय शंकर साठे यांचे आज (दि. ९) वृद्धापकाळाने वयाच्या ८१ व्या वर्षी निधन झाले. त्यांच्या



पश्चात दोन मुले आणि तीन मुली, असा परिवार आहे.

दत्तात्रेय साठे यांनी रसायनी येथील एचओसी कंपनीमध्ये अनेक वर्षे प्रामाणिकपणे सेवा बजावली. प्रेमळ व मनमिळावू स्वभावामुळे ते सर्वपरिचित होते. गावात त्यांना आदराने 'आप्पा' या नावाने ओळखले जात होते.त्यांच्या अंत्ययात्रेस सामाजिक, शैक्षणिक व राजकीय क्षेत्रातील मान्यवरांसह ग्रामस्थ व नातेवाईक मोठ्या संख्येने उपस्थित होते. त्यांचा दशक्रिया विधी रविवार, दिनांक १८ जानेवारी रोजी श्रीक्षेत्र गुळसुंदे येथे होणार असून, उत्तरकार्य बुधवार, दिनांक २१ जानेवारी रोजी गुळसुंदे येथील त्यांच्या राहत्या घरी होणार आहे.

## दमदाटी आणि बदनामीने लोंकाचे प्रश्न सुटत नाही मी रस्त्यावर लढणारा कार्यकर्त्या महादेव वाघमारे

**दैनिक युवक आधार**

**पनवेल :** 15 वर्ष आमदार तसेच स्थानिक सत्ता असताना सुद्धा येथील सत्ताधारी भाजप सरकारला येथील नागरी समस्या सोडवता आल्या नाहीत दुहेरी टॅक्स लोकांच्या माथी मारला आहे पाण्याची समस्या आहे नवीमुंबई विमानतळ दि बा पाटील नामकरण मुद्दा दोन वर्षे रखडलेला आहे ठाकूर कंपनीने स्वतःच्या स्वार्था साठी ठेके घेण्यासाठी पनवेलची अस्मिता धुळीस मिळवली आहे हि दि बा पाटलाचा संघर्ष भुमी आहे याचा विसर त्यांना पडलेला अशा ठाकूर कंपनीला व भाजपला पनवेलच्या सत्तेतून पायउतार करा असे आवाहन पनवेलच्या जनतेला करताना माजी आमदार बाळ माने खांदा कॉलनीतल चौक सभेत



सत्ताधारी भाजप वर चौफेर टीका केली पत्रकारांच्या प्रश्नांना उत्तरे देताना माने म्हणाले सिडको वसाहतीतील खांदा कॉलनीत महाराष्ट्रातील कानाकोपऱ्यातून जनता रहावयास आली आहे परंतु येथील मुलभूत व नागरी समस्या 20 वर्षानंतर सुद्धा सत्ताधारी भाजपला सोडवता आल्या नाहीत महादेव वाघमारे सारखे स्थानिक नेते आता या प्रश्नान साठी आंदोलन मोर्चा काढत त्यामुळे त्यांना साथ द्या आणि महाविकास आघाडीला विजयी करा असे आवाहन केले याच पत्रकार संवाद सभेत महादेव वाघमारे यांनी सत्ताधारी पक्षाचे वाभाडे काढले फूटपाथ यांच्या नगरसेवकांनी जणू विकत घेतले आहेत नागरिकांना चालायची सोय नाही पाण्याची समस्या आहे दुहेरी टॅक्सचा मुद्दा आम्हाला येथील नगरसेवकांच्या चुका मुळे आम्हाला न्यायलायात न्यावा लागला ठराव पास झाला नसता तर हि वेळ आली नसती पण मी या प्रश्नासाठी लढतोय म्हणून या निवडणुकीत माझी बदनामी केली जाते आहे पण दमदाटी व बदनामीने लोकांचे प्रश्न सुटत नाहीत मी रस्त्यावर लढणारा सामान्य कार्यकर्ता चुकीच्या गोष्टींन साठी सतत लढत राहणार आणि खांदा कॉलनी वासीयाना न्याय मिळवून देणार त्यामुळे येणाऱ्या निवडणुकीत महाविकास आघाडीला भरघोस मतांनी निवडून द्या असे आवाहन महादेव वाघमारे यांनी केले.

## मौजे सोनारी येथे ह.भ.प. श्री. नारायण महाराज शस्त्री केंद्रे यांची कीर्तन सेवा संपन्न

**दौनिक युवक आधार**

**राम ढाकणे/उरण प्रतिनिधी :** मौजे सोनारी येथे श्री. संत वामनभाऊ महाराज व श्री. संत भगवान बाबा यांच्या संयुक्त पुण्यतिथी निमित्त अखंड हरीनाम सप्ताहचे आयोजन केले आहे. दिनांक ८ जानेवारी २०२६ रोजी ह. भ. प. श्री. नारायण महाराज शास्त्री केंद्रे झी टॉकीज फेम, युवा कीर्तनकार तसेच समाज प्रबोधनकार यांचे सुश्राव्य असे हरिकीर्तनाची सेवा अगदी आनंदी व मोठ्या उत्साहाच्या वातावरणामध्ये मध्ये पार पाडली.

श्री. संत वामन भाऊ महाराज व श्री. संत भगवान बाबा यांच्या संयुक्त पुण्यतिथी सोहळ्या निमित्त. श्री. काशिनाथ बाबुराव तांडेल यांच्या निवास स्थानी सोनारी येथे अखंड हरीनाम सप्ताह चे श्री संत वामनभाऊ, संत भगवान बाबा गणेश सेवा मंडळ सोनारी (न्हावा-शेवा) यांनी भव्य दिव्य असे पाच दिवसाचे आयोजन केले आहेत, त्यामध्ये दुसऱ्या दिवशी दिनांक ८ जानेवारी ची हरी कीर्तन ची शेवा ह. भ. प. श्री. नारायण



महाराज केंद्रे यांनी सुश्राव्य असे हरिकीर्तन करत समाज प्रबोधन केले, या वेळी उरण तालुका पंचक्रोशी मधील तसेच पनवेल तालुका नवी मुंबई मधील सर्व क्षेत्रातील प्रतिष्ठित वेक्ती यांची उपस्थिती होती.

या अखंड हरीनाम साप्ताहची सांगता रविवार दिनांक ११ जानेवारी रोजी सकाळी १० ते १२ वाजता, ह.भ.प. महेशजी महाराज साळुंखे (भागवताचार्य ) श्री. राधागोपालनाथ, श्री. संत वामनभाऊ व भगवानबाबा संस्थान पाठनोली चे मठाधीपती. यांचे शुश्रव्य असे काल्याचे कीर्तन होईल व अखंड हरीनाम साप्ताहची सांगता होईल...!

## खांदा कॉलनी प्रभाग 15 मधील जनतेने भाजपच्या डबल इंजिनला साथ द्यावी - प्रचार प्रमुख गोपीनाथ मुंडे

**दैनिक युवक आधार**

**खांदा कॉलनी :** निवडणूक जशी जवळ येऊ लागली तशी प्रचार यंत्रणेला वेग येऊ लागला आहे दोन्ही बाजूच्या उमेदवारांनी मतदारापर्यंत थेट पोहचून आपली प्रचार यंत्रणा राबवायला सुरुवात केली आहे महायुती व महाविकास आघाडीच्या प्रचार रॅलीला देखील आता गर्दी होऊ लागली आहे महायुती आपली प्रचार यंत्रणा मायोक्रो लेवलला राबवत आहे माजी खासदार रामशेठ ठाकूर आमदार प्रशांत ठाकूर आमदार विक्रांत पाटील ठिकठिकाणी भेट देत आहेत चौक सभा घेत आहेत



खांदा कॉलनी प्रभाग 15 मध्ये भाजप मध्ये उमेदवार निवडीवरून नाराजी असली तरी ही नाराजी दूर करण्यात वरीष्ठाना यश आल्याचे पहावयास मिळत आहे या प्रभाग 15 मधील विकास आमदार प्रशांत ठाकूर व आमदार विक्रांत पाटील यांच्या नेतृत्वाखाली झालेला आहे नवीन पाण्याच्या टाक्या रमाबाई आंबेडकर भवन सरकारी दवाखाना पनवेल महापालिकेने सुरू केला आहे लवकरच फूटपाथवरील फेरीवाल्यांन हॉकरस झोन होणार आहे भविष्यात या खांदा कॉलनीत आमदार प्रशांत ठाकूर व आमदार विक्रांत पाटील यांच्या नेतृत्वाखाली अनेक नवीन विकास योजना राबविण्यात येतील हे सर्व डबल डबल इंजिन असल्याने शक्य होणार आहे त्यामुळे खांदा कॉलनी प्रभाग 15 मधील जनतेने भाजपला साथ द्यावी असे भावनिक आवाहन खांदा कॉलनी प्रभाग 15 प्रचार प्रमुख गोपीनाथ मुंडे यांनी जनतेला केले आहे

सिद्धी प्रिंटर्स
दैनिक,सायंदैनिक, साप्ताहिक, मासिक, इत्यादी
वर्तमानपत्राचे सर्व साइज मधे ब्लॅक, कलर व ४कलर
प्रिंटींग वाजवी दरात करुन मिळेल.
वर्तमान पत्राचे सर्व साईज मधे आकर्षक डिझाईन मध्ये
डीटीपी करून मिळेल
Call 9028240020 ,9220403509

# रस्ता सुरक्षा अभियान 2026 अंतर्गत नवकार CFS, रसायनी येथे कार्यशाळा संपन्न

**दैनिक युवक आधार**

**पनवेल प्रतिनिधी :** रस्ता सुरक्षा अभियान 2026 च्या अनुषंगाने आज दिनांक 09 जानेवारी 2026 रोजी सकाळी 11.30 ते 12.30 या वेळेत नवकार CFS, रसायनी रोड येथे रस्ता सुरक्षा विषयक कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते.

या कार्यशाळेमध्ये रस्ता सुरक्षा अभियान 2026 अंतर्गत राबविण्यात येणाऱ्या विविध कार्यक्रमांची सविस्तर माहिती देण्यात आली. तसेच रस्ते अपघात टाळण्यासाठी घ्यावयाची खबरदारी, आवश्यक उपाययोजना, सुरक्षित वाहनचालक पद्धती आणि वाहतूक नियमांचे पालन याबाबत सखोल मार्गदर्शन करण्यात आले.

यावेळी 31 जानेवारी 2026 पर्यंत हे रस्ता सुरक्षा अभियान नवकार CFS मध्ये प्रभावीपणे राबविण्याबाबत उपस्थित नवकार CFS चे




मॅनेजर यांना आवश्यक सूचना देण्यात आल्या. यासोबतच "सडक सुरक्षा – जीवन रक्षा" या अभियानाच्या स्लोगनचे महत्त्व समजावून सांगण्यात आले.

सदर कार्यशाळेला नवकार CFS मधील 50 ते 60 चालक व सुपरवायझर मोठ्या संख्येने उपस्थित होते. उपस्थितांनी कार्यशाळेला उत्स्फूर्त प्रतिसाद देत रस्ता सुरक्षिततेबाबत जागरूकता वाढवण्याचा संकल्प व्यक्त केला.

# एप्रिलचा मुहूर्त? जिल्हा परिषद-पंचायत समिती निवडणुकांना दोन अडथळे; उमेदवारांच्या धाबे दणाणले

**दैनिक युवक आधार**

**निलेश फुंडे/अलिबाग रेवदंडा प्रतिनिधी :** सर्वोच्च न्यायालयाच्या ३१ जानेवारी २०२६ पूर्वी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका घेण्याच्या आदेशामुळे नगर पंचायती व नगर परिषदांच्या निवडणुका पार पडल्या असल्या तरी जिल्हा परिषद व पंचायत समित्यांच्या निवडणुकांचा मुहूर्त मात्र एप्रिल महिन्यातच लागण्याची शक्यता प्रशासकीय वर्तुळात व्यक्त होत आहे. महिनाभराचा कालावधी लागणाऱ्या निवडणूक प्रक्रियेमुळे जानेवारीत जिप निवडणुका होणे अशक्य असून, फेब्रुवारी-मार्चमधील दहावी-बारावी परीक्षांमुळेही अडसर येत आहे. या पार्श्वभूमीवर अलिबाग तालुक्यातील जिप व पंचायत समिती उमेदवारांच्या धाबे दणाणले आहेत, कारण महिनाभरापासून चालू असलेला खर्च दोन महिने पुढे गेल्यास आणखी वाढेल, अशी भीती कार्यकर्त्यांमध्ये पसरली आहे.प्रशासकीय सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, राज्यातील ज्या जिल्हा परिषदांमध्ये आरक्षणाची मर्यादा ५० टक्क्यांहून अधिक ओलांडली आहे, त्या ठिकाणी फेब्रुवारीत निवडणुका होण्याची शक्यता कमी आहे. रायगडसह नागपूरसारख्या जिपमध्येही ही समस्या असल्याने निवडणुकीला एप्रिलचा मुहूर्त लागेल, अशी चर्चा आहे. २१ जानेवारीला सर्वोच्च



न्यायालयात आरक्षणाच्या मुद्द्यावर सुनावणी होणार असून, त्यानंतरच निवडणूक आयोगाची भूमिका स्पष्ट होईल. त्या आधी १० ते १५ जानेवारीत ज्या जिपमध्ये आरक्षण ५० टक्क्यांखालील आहे, तिथे निवडणूक घोषणा होऊ शकते.अलिबाग तालुक्यात उमेदवारांचा खर्चाचा डोंगर, कार्यकर्त्यांमध्ये भीतीया रखडत्या प्रक्रियेमुळे अलिबाग तालुक्यातील जिल्हा परिषद व पंचायत समिती उमेदवार चिंतेत आहेत. महिनाभरापासून "निवडणूक लवकरच" असा अंदाज बांधून कार्यकर्त्यांना सोबत घेत महाराष्ट्र सरकारच्या योजनांचे श्रेय स्वतःचे सांगत फिरणारे उमेदवार आता मटण-दारू पार्ट्यांचा खर्च चालू ठेवत आहेत. मात्र, निवडणुका एप्रिल-मेमध्ये गेल्यास हा खर्च आणखी दोन महिने वाढेल आणि पुढेही सतत खर्चाची धावपळ होईल, अशी भीती कार्यकर्त्यांमध्ये आहे. "उमेदवारांच्या खिशावरूनच आम्ही धावतोय, पण हे चालू राहिले तर सर्वांचे कंबरडेचं तुटेल," अशी जोरदार चर्चा कार्यकर्त्यांमध्ये रंगली आहे. दरम्यान, फेब्रुवारीच्या दुसऱ्या आठवड्यापूर्वी कमी आरक्षण असलेल्या जिपमध्ये निवडणुका होण्याची शक्यता आहे. अन्यथा, परीक्षा कालावधीमुळे मार्चअखेरपर्यंत प्रक्रिया अडकून एप्रिलमध्येच मुहूर्त लागेल, असा अंदाज प्रशासकीय पातळीवर व्यक्त केला जात आहे.

# मौजे सोनारी येथे ह.भ.प. श्री. नारायण महाराज शस्त्री केंद्रे यांची कीर्तन सेवा संपन्न

**दौनिक युवक आधार**

**राम ढाकणे/उरण प्रतिनिधी :** मौजे सोनारी येथे श्री. संत वामनभाऊ महाराज व श्री. संत भगवान बाबा यांच्या संयुक्त पुण्यतिथी निमित्त अखंड हरीनाम सप्ताहचे आयोजन केले आहे. दिनांक ८ जानेवारी २०२६ रोजी ह. भ. प. श्री. नारायण महाराज शास्त्री केंद्रे झी टॉकीज फेम, युवा कीर्तनकार तसेच समाज प्रबोधनकार यांचे सुश्राव्य असे हरिकीर्तनाची सेवा अगदी आनंदी व मोठ्या उत्साहाच्या वातावरणामध्ये मध्ये पार पाडली.

श्री. संत वामन भाऊ महाराज व श्री. संत भगवान




बाबा यांच्या संयुक्त पुण्यतिथी सोहळ्या निमित्त. श्री. काशिनाथ बाबुराव तांडेल यांच्या निवास स्थानी सोनारी येथे अखंड हरीनाम सप्ताह चे श्री संत वामनभाऊ, संत भगवान बाबा गणेश सेवा मंडळ सोनारी (न्हावा-शेवा) यांनी भव्य दिव्य असे पाच दिवसाचे आयोजन केले आहेत, त्यामध्ये दुसऱ्या दिवशी दिनांक ८ जानेवारी ची हरी कीर्तन ची शेवा ह. भ. प. श्री. नारायण महाराज केंद्रे यांनी सुश्राव्य असे हरिकीर्तन करत समाज प्रबोधन केले, या वेळी उरण तालुका पंचक्रोशी मधील तसेच पनवेल तालुका नवी मुंबई मधील सर्व क्षेत्रातील प्रतिष्ठित वेक्ती यांची उपस्थिती होती

या अखंड हरीनाम साप्ताहची सांगता रविवार दिनांक ११ जानेवारी रोजी सकाळी १० ते १२ वाजता, ह.भ.प. महेशजी महाराज साळुंखे (भागवताचार्य ) श्री. राधागोपालनाथ, श्री. संत वामनभाऊ व भगवानबाबा संस्थान पाठनोली चे मठाधीपती. यांचे शुश्रव्य असे काल्याचे कीर्तन होईल व अखंड हरीनाम साप्ताहची सांगता होईल...!

# ब्राईट फ्युचर हायस्कूल उलवे नवी मुंबई येथे राष्ट्रीय रस्ता सुरक्षा अभियानांतर्गत वाहतूक पोलिसांतर्फे जनजागृती

**दैनिक युवक आधार**

**उमाकांत पानसरे :** गेल्या काही वर्षात नवी मुंबईत झपाट्याने वाढणारी शहरे आंतरराष्ट्रीय दर्जाचे विमानतळ , अटल सेतू अशा विविध प्रकारच्या विकास कामांमुळे अर्थातच वाहतूक व्यवस्था अत्यंत चोख असावी यासाठी उलवे उरण आणि पनवेल या शहरांमध्ये वाहनांच्या वर्दळीमुळे रस्त्यावरील वाहनांच्या गर्दीला नियंत्रित करून छोटे-मोठे अपघात रोखणे हे वाहतूक पोलीस यंत्रणेसाठी फार मोठे आव्हान आहे आणि म्हणून राष्ट्रीय




रस्ता सुरक्षा अभियानांतर्गत 7 जानेवारी 2026 रोजी ब्राईट फ्युचर हायस्कूल उलवे नवी मुंबई या ठिकाणी सकाळी 11 ते 11:30 वाजेच्या दरम्यान शालेय विद्यार्थ्यांना व शिक्षकांना वाहतुकीचे नियम समजावून प्रात्यक्षिकांद्वार योग्य ते मार्गदर्शन करताना

वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्रीमती वैशाली गलांडे यांनी नागरिकांनी रस्त्यावर वाहन चालवताना वाहतुकीचे सर्व नियम कसोशीने पाळण्याचे आवाहन केले आणि अपघात रोखण्यासाठी विविध प्रकारच्या योजनांबद्दल अतिशय महत्त्वाचे मार्गदर्शन केले.

सदर अभियाना अंतर्गत हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी पोलीस हवालदार गोंधळी , पोलीस हवालदार मोरे , पोलीस हवालदार माळी , पोलीस नाईक निलेश मोरे यांनी उपस्थित राहून ब्राईट फ्युचर हायस्कूलच्या या जनजागृती बद्दल शिक्षक आणि कर्मचाऱ्यांचे या उपक्रमाबद्दल आभार मानले .

# कै.शामलाताई बिडकर, जनता विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय यांचे संयुक्त स्नेहसंमेलन उत्साहात साजरे

**दैनिक युवक आधार**

**प्रतिनिधी बागलाण/दीपक गायकवाड :** बागलाण:मुल्हेर येथील कै.शामलाताई बिडकर इंग्लिश मीडियम स्कूल ,जनता विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय यांचे वार्षिक स्नेहसंमेलन जनता विद्यालयच्या प्रांगणात मोठ्या उत्साहाने साजरा करण्यात आला.

या स्नेहसंमेलनाचे अध्यक्ष मुल्हेरचे विद्यमान सरपंच निंबा भाणसे हे होते.प्रमुख पाहुणे म्हणून डांग सेवा मंडळाच्या अध्यक्षा हेमलताताई बिडकर, संचालक प्रभाकर पवार, श्रीकृष्ण चंद्रात्रे, अनिल पंडित, केंद्रप्रमुख राहुल कापुरे, शाळा व्यवस्थापन समिती






उपाध्यक्ष हरिदास बत्तीसे, पालक शिक्षक संघाचे उपाध्यक्ष शरद कुमार गांगुर्डे, शिक्षण तज्ञ म्हणून उमेश दीक्षित हे उपस्थित होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री येवला सर, महेंद्र सूर्यवंशी सर,मोरे सर यांनी केले.प्राचार्य एस सी धात्रक सर यांनी प्रस्तावनेतून सांगितलं की स्नेहसंमेलन आयोजनाने विद्यार्थ्यांचे कलागुण जोपासले जाऊन विद्यार्थ्यांना शिक्षणाची गोडी, नृत्य, नाटिकेने समाज प्रबोधनाचे काम होत असते. सदर झालेल्या स्नेहसंमेलन मध्ये अनेक लोकगीते, नाटिका, सिने चित्रपटातील गाणे, देशभक्तीपर गीते सादर करण्यात आली. यादरम्यान प्रत्येक नाटिकेस, नृत्यास उपस्थित रसिकांनी भरभरून प्रतिसाद देत बंद पाकिटे, रोख रक्कम देऊन विद्यार्थ्यांचे भरभरून कौतुक केले. यावेळी कार्यक्रमास समको बँकेचे संचालक सचिन कोठावदे, जीवन माळी, माजी ग्रा.प.सदस्य विनोद शिंदे, माळीवाडे सरपंच काशिनाथ गवळी, चूनीलाल ठाकरे, सुनील येवला, डॉ.शिवाजी जाधव, दत्तात्रेय येवला, हेमंत वायकर, हॉटेल मौसम कट्टाचे संचालक मनोज कुटे यांच्यासह मोठ्या संख्येने ग्रामस्थ व विद्यार्थी उपस्थित होते.

**राज्यस्तरीय क्रीडा स्पर्धेतील गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार**

रोहित भानसे, गणेश पवार, सोनाली अहिरे, जयमला बर्डे यांना विशेष मान्यवरांच्या हस्ते क्रीडा स्पर्धेत केलेल्या उल्लेखनीय कामगिरीबद्दल गौरवण्यात आले.

# नवीन पनवेल वाहतूक शाखेतर्फे रस्ता सुरक्षा अभियान 2026 अंतर्गत जनजागृती कार्यक्रम

**दैनिक युवक आधार**

**पनवेल प्रतिनिधी :** नवीन पनवेल वाहतूक शाखेच्या वतीने दिनांक 8 जानेवारी 2026 रोजी रस्ता सुरक्षा अभियान 2026 च्या अनुषंगाने तसेच पोलीस रेझिंग डेच्या निमित्ताने छत्रपती शिवाजी महाराज विद्यापीठ येथे विद्यार्थ्यांसाठी वाहतूक जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

या कार्यक्रमात नवीन पनवेल वाहतूक शाखेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. सपकाळ साहेब यांनी उपस्थित विद्यार्थ्यांना वाहतूक नियमांचे महत्त्व, रस्त्यावरील सुरक्षित वर्तन, हेल्मेट व सीट बेल्टचा वापर, वेगमर्यादा पाळण्याची गरज तसेच अपघात टाळण्यासाठी घ्यावयाच्या खबरदारीबाबत सविस्तर मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांनी भविष्यात जबाबदार नागरिक म्हणून वाहतूक नियमांचे काटेकोर पालन करावे, असे आवाहन त्यांनी केले.

या वेळी पोलीस उपनिरीक्षक श्री. शशिकांत



पवार, पोलीस हवालदार श्री. ज्ञानेश्वर वाघ, पोलीस हवालदार श्री. कदम तसेच पोलीस शिपाई श्री. योगेश जाधव हे उपस्थित होते.सदर कार्यक्रमास सुमारे १५० ते २०० विद्यार्थी मोठ्या उत्साहाने उपस्थित राहून वाहतूक सुरक्षिततेबाबत माहिती घेतली.

या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये वाहतूक नियमांविषयी जनजागृती निर्माण होण्यास मोठी मदत झाली, असे आयोजकांकडून सांगण्यात आले.

# चिखलवर्धा येथे घरातील चोरीचा छडा; पारवा पोलिसांकडून दोघांना अटक

**दैनिक युवक आधार**

**घाटंजी तालुका प्रतिनिधी/महेश पेन्दोर :** घाटंजी पारवा: घरफोडीच्या घटनेचा तपास लावत पारवा पोलिसांनी दोन आरोपींना अटक केली असून त्यांच्याकडून चोरीचा काही मुद्देमाल हस्तगत केला आहे.

चिखलवर्धा येथील रहिवासी अमजद खान मजीद खान यांच्या घरातील लाकडी कपाटात ठेवलेले २२,४०० रुपये अज्ञात चोरट्याने लंपास केले होते. ही घटना ८ जानेवारी २०२६ रोजी समोर आली. अमजद खान यांच्या तक्रारीवरून पारवा पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा (अ.क्र. ०८/२०२६) नोंदवण्यात आला होता.

गुन्ह्याचे गांभीर्य ओळखून




पोलिसांनी तातडीने तपास चक्र फिरवली. तपासादरम्यान संशयावरून शंकर निरंतर मेश्राम आणि मारुती हनु मेश्राम (दोन्ही राहणार चिखलवर्धा) यांना ताब्यात घेण्यात आले. सखोल चौकशीअंती या दोघांनी चोरी केल्याचे निष्पन्न झाले.

**मुद्देमाल जप्त:**

पोलिसांनी दोन्ही आरोपींना अटक केली असून त्यांच्याकडून चोरीला गेलेल्या रकमेपैकी ११,००० रुपये जप्त केले आहेत. ही कारवाई सहाय्यक पोलीस निरीक्षक, हेमंत चौधरी पारवा यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली.

# गोदाकाठची पवित्रभूमी २०२६" दिनदर्शिकेचे भव्य प्रकाशन

**दैनिक युवक आधार**

**नाशिक जिल्हा प्रतिनिधी/राहुल कुलकर्णी :** गोदावरी नदीच्या काठावर वसलेली नाशिक व त्र्यंबकेश्वरची पावन भूमी, प्रभू श्रीरामचंद्र, माता सीता, लक्ष्मण, बजरंगबली तसेच अनेक संत-महात्मे व देवी-देवतांच्या पदस्पर्शाने पवित्र झालेली आहे. याच पवित्र परंपरेचा वारसा जपणारी "गोदाकाठची पवित्रभूमी २०२६" ही दिनदर्शिका खेडलेझुंगे येथील योगीराज तुकाराम बाबा खेडलेकर संस्थानच्या वतीने भाविकांच्या सेवेत सादर करण्यात आली. या दिनदर्शिकेचे प्रकाशन संस्थानचे अध्यक्ष संत ह.भ.प. रघुनाथ महाराज खेडलेकर यांच्या शुभहस्ते मोठ्या भक्तिभावात पार पडले. योगीराज तुकाराम बाबा खेडलेकर संस्थानच्या पौष पायी वारी दिंडी सोहळ्यानिमित्त खेडलेझुंगे नगरीत ग्रामप्रदक्षिणा झाल्यानंतर दिंडी संतवन, नक्षत्रवन, नवग्रह गणपती मंदिर व १११ फूट उंच हनुमान मूर्तीसमोरील प्रांगणात दाखल झाली. स्वानंदसुख निवासी योगीराज वै. ह.भ.प. तुकाराम बाबांच्या पूजन व आरतीनंतर या दिनदर्शिकेचा प्रकाशन सोहळा पार पडला.यावेळी डॉ. श्रीकांत आवारे, आनंदराव घोटेकर, विजय कोंडाजी सदाफळ यांच्यासह खेडलेझुंगे व पंचक्रोशीतील ग्रामस्थ, वारकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**तीर्थक्षेत्रांचे मनमोहक दर्शन**

या दिनदर्शिकेत त्र्यंबकेश्वर




पासून कोपरगाव बेट येथील राष्ट्रसंत सद्गुरू जनार्दन स्वामी महाराज समाधी मंदिरापर्यंत गोदावरीकाठावरील विविध तीर्थक्षेत्रांची माहिती देण्यात आली आहे. प्रत्येक महिन्याच्या पानावर वेगवेगळ्या तीर्थस्थळांची आकर्षक छायाचित्रे समाविष्ट करण्यात आली आहेत. प्रमुख तीर्थक्षेत्रांमध्ये गोदावरी नदीकाठावरील करंजगाव येथील श्री सिद्धेश्वर महादेव मंदिर, नांदूरमधमेश्वर येथील श्री मध्यमेश्वर महादेव मंदिर, मृगव्याधेश्वर महादेव मंदिर, योगीराज तुकाराम बाबा संस्थानचे संतवन, नक्षत्रवन, १११ फूट हनुमान मूर्ती, विविध संतांच्या समाधी मंदिरे, तसेच नाशिक–छत्रपती संभाजीनगर महामार्गावरील नैताळे, धारणगाव, गाजरवाडी, रुई, देवगाव, सारोळे थडी, खानगाव थडी, करंजी आदी ठिकाणांचा समावेश आहे.

**धार्मिक व सांस्कृतिक माहितीने परिपूर्ण**

सण-उत्सव, प्रदोष, चतुर्थी, पौर्णिमा, अमावस्या, तसेच सर्व राष्ट्रपुरुषांच्या जयंती व पुण्यतिथींची माहिती या दिनदर्शिकेत देण्यात आली असून, धार्मिक व सांस्कृतिक परंपरा जपणारी ही दिनदर्शिका प्रत्येकाच्या देवघरात असावी, असे आवाहन संपादक मुकुंद आव्हाड यांनी केले आहे. सामाजिक बांधिलकी जपत पुण्याचे वाटेकरी होण्यासाठी भाविकांनी ही दिनदर्शिका खरेदी करावी, असेही त्यांनी नमूद केले.

# कांदळी येथे पत्रकार दिन उत्साहात साजरा

## विद्यार्थ्यांना शालेय गणवेश व साहित्याचे वाटप

**दैनिक युवक आधार**

**उमेश साखरकर दिग्रस प्रतिनिधी :** निर्भय व युवा ग्रामीण पत्रकार संघटनेच्या वतीने दरवर्षीप्रमाणे याही वर्षी पत्रकार दिनाचे औचित्य साधून सामाजिक बांधीलकी जपण्यात आली. दिग्रस तालुक्यातील कांदळी येथील जिल्हा परिषद उर्दू शाळेमध्ये विद्यार्थ्यांना शालेय गणवेश आणि शैक्षणिक साहित्याचे वाटप करून आदर्शवत पत्रकार दिन साजरा करण्यात आला.

या विशेष कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी निर्भय व युवा ग्रामीण पत्रकार संघटनेचे राष्ट्रीय अध्यक्ष गणेश कचकलवार होते. प्रमुख पाहुणे म्हणून दिग्रसचे नायब तहसीलदार सुधाकर राठोड, दिग्रस पोलीस स्टेशनचे ठाणेदार वैजनाथ मुंडे,जिल्हा अध्यक्ष लक्ष्मण टेकाळे,जिल्हा संघटक पुरूषोत्तम कुडवे यांची उपस्थिती होती. या मान्यवरांच्या हस्ते विद्यार्थ्यांना साहित्याचे वाटप करण्यात आले.पत्रकारितेसोबतच सामाजिक बांधिलकी केवळ बातम्यांमधून समाजाचे प्रश्न मांडण्यापुरते मर्यादित न राहता, पत्रकार संघाने ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांच्या शिक्षणाला हातभार लावण्याचे काम केले आहे. "शिक्षण हा मुलांचा हक्क आहे आणि त्यात परिस्थितीमुळे अडथळा येऊ नये, या भावनेतून हा उपक्रम राबवण्यात आला," असे मत यावेळी मान्यवरांनी व्यक्त केले. शाळेतील गरजू विद्यार्थ्यांना नवीन शालेय गणवेश देण्यात आले. वह्या, पेन आणि इतर आवश्यक



साहित्याचे वाटप करून विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर आनंद फुलवण्यात आला.उपस्थित मान्यवरांनी विद्यार्थ्यांना शिक्षणाचे महत्त्व सांगून उज्ज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या.या उपक्रमामुळे शाळा व्यवस्थापन समिती, शिक्षक आणि ग्रामस्थांनी निर्भय व युवा ग्रामीण पत्रकार संघटनेचे आभार मानले आहेत. कार्यक्रमाला तालुका अध्यक्ष लुकमान खान ,लक्ष्मण चव्हाण,सुनील हिरास संजय राऊत,संतोष कदम उमेश भटकर, उमेश साखरकर अनिकेत सूर्यवंशी व संघटनेचे पदाधिकारी, पत्रकार बांधव आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.तदनंतर लगेच दिग्रस विश्रामगृह येथे संघटनेचे राष्ट्रीय अध्यक्ष गणेश कचकलवार यांच्या उपस्थितीत राजपाल बनसोड तालुका अध्यक्ष (ग्रामीण पत्रकार संघटना तालुका अध्यक्ष) यांच्या सह विलास निकम,सुनील साबळे, यादव गावंडे,रामदास मागुळकर, प्रफुल व्यवहारे,ज्ञानराज ढोरे, अक्षय काळबांडे यांनी निर्भय व युवा ग्रामीण पत्रकार संघटनेत जाहीर रित्या प्रवेश केला

# आयएसव्हीआयआर महाराष्ट्रची नूतन कार्यकारिणी जाहीर

## विना-शस्त्रक्रिया उपचार क्रांतीचा राज्यभर विस्तार करण्याचा निर्धार

**दैनिक युवक आधार**

**विशेष प्रतिनिधी | मुंबई** : महाराष्ट्रातील वैद्यकीय क्षेत्रासाठी अत्यंत महत्त्वाची घडामोड ठरली असून Indian Society of Vascular and Interventional Radiology (ISVIR) च्या महाराष्ट्र शाखेची २०२५–२६ या कालावधीसाठी नूतन कार्यकारिणी अधिकृतरीत्या जाहीर करण्यात आली आहे. ही निवड प्रक्रिया निवडणूक निर्णय अधिकारी डॉ. राजेश मुंडादा (नागपूर) यांच्या देखरेखीखाली बिनविरोध व एकमताने पार पडली. या बिनविरोध निवडीतून महाराष्ट्रातील इंटरव्हेंशनल रेडिओलॉजी क्षेत्रातील डॉक्टरांमधील व्यावसायिक सलोखा, संघटनात्मक एकजूट आणि सामूहिक दृष्टीकोन अधोरेखित झाला आहे.



या नूतन कार्यकारिणीत अध्यक्षपदी डॉ. अविनाश गुट्टे यांची निवड करण्यात आली आहे. ते Grant Medical College & JJ Hospital, मुंबई येथे प्राध्यापक व इंटरव्हेंशनल रेडिओलॉजी विभागप्रमुख म्हणून कार्यरत आहेत. सचिवपदाची धुरा डॉ. शिवाजी पोळे यांच्याकडे सोपवण्यात आली असून ते MGM Hospital, छत्रपती संभाजीनगर येथे विभागप्रमुख आहेत.

उपाध्यक्षपदी डॉ. विवेक उकिरडे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. ते LT Medical College & Sion Hospital, मुंबई येथे प्राध्यापक म्हणून कार्यरत आहेत. आगामी कार्यकाळातील अध्यक्ष (President-Elect) म्हणून डॉ. यादव मुंडे यांची निवड करण्यात आली असून ते Ruby Hall Clinic, पुणे येथे इंटरव्हेंशनल रेडिओलॉजी विभागप्रमुख आहेत.

कोषाध्यक्षपदी डॉ. तेजस सदावर्ते (जीएमसी, नागपूर) यांची निवड करण्यात आली आहे. तसेच सह-सचिव म्हणून डॉ. पृथ्वीराज जाधव आणि डॉ. स्वेनिल शाह यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

यासोबतच मुंबई, नागपूर, चंद्रपूर आणि छत्रपती संभाजीनगर येथील अनुभवी व नामांकित तज्ज्ञ डॉक्टरांची कार्यकारिणी सदस्य म्हणून निवड करण्यात आली असून, त्यामुळे संपूर्ण महाराष्ट्राचे भौगोलिक व वैद्यकीय प्रतिनिधित्व या नूतन कार्यकारिणीत साध्य झाले आहे.

१९९७ साली अवघ्या २८ सदस्यांपासून सुरू झालेल्या ISVIR संस्थेने आज १,२०० हून अधिक राष्ट्रीय सदस्यसंख्या गाठली आहे. इंटरव्हेंशनल रेडिओलॉजी ही 'पिनहोल' तंत्रज्ञानावर आधारित अत्याधुनिक उपचारपद्धती असून, मेंदूतील स्ट्रोक, रक्तवाहिन्यांचे आजार, व्हेरिकोज व्हेन्स तसेच कॅन्सरसारख्या गंभीर आजारांवर विना-शस्त्रक्रिया, कमी वेदनादायक आणि कमी कालावधीतील उपचार देणे शक्य झाले आहे. रुग्णालयात कमी दिवस राहणे, जलद बरे होणे आणि उपचार खर्चात बचत होणे, हे या पद्धतीचे मोठे फायदे आहेत.

नूतन कार्यकारिणीने पुढील कार्यकाळात प्रशिक्षण, संशोधन आणि उपचारांचा विस्तार या तीन प्रमुख उद्दिष्टांवर भर देण्याचा निर्धार व्यक्त केला आहे.

महाराष्ट्रातील जिल्हा व तालुका पातळीपर्यंत इंटरव्हेंशनल रेडिओलॉजी सेवा पोहोचवणे, तरुण डॉक्टरांना जागतिक दर्जाचे प्रशिक्षण देणे आणि सर्वसामान्य रुग्णांना या जीवनरक्षक उपचारांचा लाभ मिळवून देणे, हा या कार्यकारिणीचा मुख्य अजेंडा असणार आहे.

आरोग्य क्षेत्रात आधुनिक तंत्रज्ञानाचा व्यापक वापर आणि रुग्णकेंद्रित उपचारपद्धती यासाठी ISVIR महाराष्ट्रची नूतन कार्यकारिणी आगामी काळात निर्णायक भूमिका बजावेल, अशी अपेक्षा वैद्यकीय वर्तुळातून व्यक्त करण्यात येत आहे.

# सामाजिक कार्यकर्ते तथा सांगळुद ग्रामपंचायत उपसरपंच शरद आठवले तरणार निवडणूक रिंगणात

**दैनिक युवक आधार**

**ज्ञानेश्वर काळे/तालुका प्रतिनिधी दर्यापूर :** दर्यापूर तालुक्यातील जिल्हा परिषद निवडणुकीचा रणसंग्राम जोड पकडू लागला आहे. कोण कोणत्या सर्कल मधून निवडणूक लढणार याची चर्चा सध्या राजकीय पातळीवर तसेच गावागावात रंगू लागलेली आहे. या पार्श्वभूमीवर सांगळूद ग्रामपंचायतचे उपसरपंच आणि लोकप्रिय सामाजिक कार्यकर्ते शरद आठवले यांनी जिल्हा परिषद निवडणूक रिंगणात निवडणूक रिंगणात उतरण्याची घोषणा करून राजकीय वर्तुळात नवा उत्साह निर्माण केला आहे. यावर्षी दर्यापूर तालुक्यातील चारही जिल्हा परिषद सर्कल अनुसूचित जातीसाठी राखीव आहेत. या सर्कल



मधून अनेक नवीन चेहरे आपले नशीब आजमवण्यात सज्ज झाले असून शरद आठवले हे त्यातले एक प्रभावी आणि लोकसंपर्क अग्रेसर नाव ठरत आहे. शरद आठवले हे दोन वेळा ग्रामपंचायत सदस्य आणि एक वेळ उपसरपंच कार्य करत राहिले आहेत. त्यांनी आपल्या कार्यकाळात विकास कामे ग्राम स्वच्छता पिण्याच्या पाण्याची योजना तसेच सामाजिक सलोखा आणि सर्व धर्मीय लोकांना एकत्र आणणारी भूमिका निभावली आहे. त्यामुळे त्यांची पकड सर्व जाती धर्मातील मजबूत असून. त्यांना स्थानिक पातळीवर विश्वासार्ह आणि कार्यक्षम नेते म्हणून ओळख मिळाली आहे. त्यांच्या उमेदवारीबाबत बोलताना शरद आठवले मी कोणत्या पक्षाकडून निवडणूक लढणार अद्याप निश्चित नाही परंतु जिल्हा परिषदेतून सध्याच्या राजकीय समीकरणाच्या आणि नागरिकांच्या अपेक्षांच्या विचार करून योग्य पक्षांच्या माध्यमातून निवडणूक लढण्याचा निर्णय घेईल. माझा उद्देश फक्त येणे नाही तर खऱ्या अर्थाने जनतेची सेवा करणे आहे. गेल्या अनेक वर्षापासून शेतकरी युवक महिला बचत गट तसेच समाजातील वंचित घटकांचा प्रश्नावर सातत्याने लढा देत आहे त्यांच्या कार्यामुळे सांगळुदसह परिसरातील अनेक तरुण आणि नागरिक त्यांच्यावर विश्वास ठेवतात. राजकीय विश्लेषकांचे म्हणणे आहे की शरद आठवले यांचे नाव जाहीर होताच दर्यापूर तालुक्यातील जिल्हा परिषद निवडणूक अधिकच रंगतदार होणार आहे. त्यांच्या जनसंपर्काची ताकद आणि कार्याचा ठसा पाहता ते या निवडणुकीत महत्त्वाचे समीकरण बदलू शकतात असा अंदाज वर्तवला जात आहे.

## निफाड तालुक्यात वाढत्या थंडीचा पहिला बळी; देवगाव येथील २२ वर्षीय युवकाचा थंडीने काकडून दुर्दैवी मृत्यू

**दैनिक युवक आधार**

**राजेश भडांगे/निफाड तालुका प्रतिनिधी :** निफाड तालुक्यात गेल्या काही दिवसांपासून तापमानात मोठी घट झाल्याने कडाक्याच्या थंडीचा फटका नागरिकांना बसत आहे. या वाढत्या थंडीमुळे यावर्षीचा पहिला दुर्दैवी मृत्यू नोंदवण्यात आला असून, देवगाव (ता. निफाड) येथील २२ वर्षीय युवकाचा थंडीने काकडून मृत्यू झाल्याची घटना समोर आली आहे.



देवगाव येथील पाटबंधारे विभागाच्या कार्यालयाजवळ आज शुक्रवार, दि. ९ जानेवारी रोजी सकाळी सुमारे ८ वाजण्याच्या सुमारास समीर दौलत सोनवणे (वय २२) हा युवक मृतावस्थेत आढळून आला. ही बाब लक्षात येताच पोलिस पाटील सुनील बोचरे यांनी तात्काळ लासलगाव पोलिसांना माहिती दिली.

माहिती मिळताच सहाय्यक पोलिस निरीक्षक भास्करराव शिंदे, पोलिस हवालदार संदीप शिंदे व औदुंबर मुरडनर यांनी घटनास्थळी धाव घेत पंचनामा केला. त्यानंतर मृतदेह शवविच्छेदनासाठी लासलगाव ग्रामीण रुग्णालयात पाठवण्यात आला.

शवविच्छेदनाच्या प्राथमिक अहवालानुसार अति थंडीमुळे हृदयविकाराचा तीव्र झटका आल्याने युवकाचा मृत्यू झाल्याचे निष्पन्न झाले आहे. या प्रकरणी लासलगाव पोलिस ठाण्यात गुन्हा रजिस्टर नंबर ०१/२०२६ भा. न्या. संहिता कलम १९४ अन्वये आकस्मिक मृत्यूची नोंद करण्यात आली आहे.

वाढत्या थंडीच्या पार्श्वभूमीवर नागरिकांनी, विशेषतः रात्रीच्या वेळी, योग्य ती खबरदारी घ्यावी, असे आवाहन सहाय्यक पोलिस निरीक्षक भास्करराव शिंदे यांनी केले आहे.

# बांधकाम कामगाराच्या विविध मागण्या संदर्भात कारवाई न झाल्याने धडक बांधकाम कामगार संघटनेच्या वतीने तहसील कार्यालयास देण्यात आले निवेदन

**जाफराबाद तालुका/ अशोक म्हस्के :** जाफराबाद तालुक्यातील बांधकाम कामगार यांच्यासाठी शासनाच्या विविध कल्याणकारी योजनांच्या बांधकाम कामगारांना लाभ मिळत नसल्याची धडक बांधकाम संघटनेच्या वतीने मागणी अगोदर तहसील कार्यालयास निविदानाद्वारे करण्यात आलेली होती. परंतु प्रशासनाने त्यावर कोणत्याही प्रकारची प्रतिबंध किंवा कारवाई करून बांधकाम कामगारांचे प्रश्न मार्गी लावण्यात आलेले नाही. बांधकाम कामगार हा मुळातच गरीब असतो तो आपले जीवन जगण्यासाठी किंवा आपल्या कुटुंबाचा उदरनिर्वासाठी बांधकाम करत असतो. बांधकाम करत असताना तो आपल्या जीवावर उदार होऊन काम करत असतो. बांधकाम करत असताना त्याला त्याच्या जीवाची कसल्याही प्रकारची जोखीम स्वीकारून काम करत असतो. शासनाने बांधकाम कामगारांचे जीवन सुखमय व सुरळीत होण्यासाठी



किंवा त्यांचे आयुष्य चांगले सुखी जगण्यासाठी त्यांना शासनाच्या विविध योजना चालू केल्या आहेत. बांधकाम कामगाराच्या ज्या काही कल्याणकारी योजना आहे त्या बांधकाम कामगाराच्या शेवटच्याखालच्या स्तरापर्यंत पोहोचण्यास दुर्लक्ष होत आहे. महाराष्ट्र इमारत आरोग्य उपचार योजना ह्या जाफराबाद तालुक्याच्या ठिकाणी उपलब्ध करून कामगारांना दिलासा देण्यात यावा. रद्द झालेले क्लेम अपडेट करून ताबडतोब मंजूर करून देण्यात यावे. बांधकाम कामगाराची नवीन नोंदणी तसेच रिनेवल अपॉइंटमेंट लगेच चार ते पाच दिवसात करण्यात यावे. वैद्यकीय साह्य उपचार हा जाफराबाद तालुक्याच्या ठिकाणी करण्यात यावा. महाराष्ट्र कामगार कल्याणकारी मंडळातील नोंदणीकृत बांधकाम कामगाराच्या तपासणी व उपचार योजना लागू करण्यात आलेले आहे तपासणीसाठी टेस्ट म्हणून जे रक्त घेतले जातात परंतु त्या नंतर त्या बांधकाम कामगारास कोणत्याही प्रकारची उपचार सुविधा मिळत नाही. अशा अनेक कल्याणकारी बांधकाम कामगारास जाफराबाद तालुका या ठिकाणी मिळाव्या यासाठी बांधकाम कामगार धडक संघटनेच्या वतीने तहसील कार्यालय जाफराबाद यांना आज दिनांक 09/01/2026रोजी निवेदन देण्यात आलेआहे. बांधकाम कामगार यांना या योजना चा लाभ घेण्यासाठी जाफराबाद तालुक्याचा ठिकाण सोडून जिल्ह्याच्या ठिकाणी किंवा इतर फार दूरच्या ठिकाणी जावे लागते, त्यांना हा प्रवास खर्च व एका दिवसाचे मजुरीचे नुकसान करावे लागते.प्रशासन या सर्व योजनांची दखल घेऊन या संबंधित खात्याची समन्वय साधून बांधकाम कामगारांना या कल्याणकारी योजना चा लाभ जाफराबाद तालुक्याच्या ठिकाणी देण्यात यावा नसता बांधकाम कामगाराच्या पदाधिकाऱ्यांनी येणाऱ्या पुढील काळात यापेक्षा तीव्र आंदोलन छेडू असा प्रशासनास इशारा दिलेला आहे. पुढील काळात जे तीव्र स्वरूपाचे आंदोलन होईल त्या परिणामाची जबाबदारी ही सर्व प्रशासनाची राहील असे निवेदनात पदाधिकारी यांनी म्हटले आहे. या निवेदनावर धडक बांधकाम कामगार जाफराबाद तालुका अध्यक्ष सुनील हिवाळे, जाफराबाद तालुका उपाध्यक्ष नासेर शहा, सचिव विजय लोखंडे, नाजीम खान कुरेशी यांच्या सह्या आहेत.

# माहितीच्या अधिकाराअंतर्गत शुल्क कळविण्याच्या मुदतीत सुधारणा

**दैनिक युवक आधार**

**प्रतिनिधी सतीश कडू :** माहितीचा अधिकार अधिनियमा अंतर्गत माहिती शुल्क अर्जदारास कळविण्याच्या कार्यपध्दतीत बदल करण्यात आला असून ठराविक कालावधीत माहिती शुल्क कळविण्याची सक्ती जनमाहिती अधिकाऱ्यावर राहिलेली नाही. अर्ज प्राप्त झाल्यापासून 30 दिवसांच्या आत अर्जदारास माहिती उपलब्ध करुन देणे मात्र पूर्वीप्रमाणेच बंधनकारक आहे.

माहितीचा अधिकार अधिनियमाअंतर्गत जनमाहिती अधिकारी यांनी माहितीचा अर्ज प्राप्त झाल्यानंतर शक्य तितक्या शिघ्रतेने आणि कोणत्याही परिस्थितीत विनंती केल्यापासून 30 दिवसांच्या आत अर्जदारास माहिती देणे आवश्यक आहे. तसेच कलम 7 (3)(क) अन्वये अतिरिक्त शुल्काबाबतची सूचना पाठविल्यानंतर व शुल्क प्रदान केल्याचा कालावधी हा 30 दिवसांच्या कालावधीची परिगणना करण्याच्या प्रयोजनार्थ वगळण्याची तरतूद आहे. माहितीच्या अधिकाराअंतर्गत प्राप्त होणाऱ्या अर्जा मध्ये माहिती पुरविण्यासाठी शुल्क आकारावयाचे असल्यास अधिनियमातील तरतुदीनुसार व प्रत्येक प्रकरणातील परिस्थिती विचारात घेऊन माहितीची पृष्ठसंख्या व टपालखर्चासह, माहितीच्या शुल्काची रक्कम टपालाने किंवा ई-मेलव्दारे शक्य तितक्या लवकर अर्जदारास कळवावी, अशी सुधारणा करण्यात आली आहे. यापूर्वी जनमाहिती अधिकाऱ्याने माहिती अर्ज प्राप्त झाल्यानंतर 10 दिवसापर्यत माहितीच्या शुल्काची रक्कम कळवायची होती.

# क्रांतिकारी शिक्षक संघटने तर्फे राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार सोहळा-२०२५

**दैनिक युवक आधार**

**पाटोदा (प्रतिनिधी) :** समाजाच्या जडण घडणीत मोलाचे योगदान देणाऱ्या शिक्षकांचा सन्मान करण्यासाठी क्रांतिकारी शिक्षक संघटना, महाराष्ट्र यांच्या वतीने "राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार सोहळा-२०२५ चे भव्य आयोजन करण्यात आले आहे. या सोहळ्यात संपूर्ण महाराष्ट्रातील विविध माध्यमांतील मराठी, हिंदी, उर्दू, इंग्रजी मधील कार्यरत शिक्षकांच्या शैक्षणिक, सामाजिक व शिक्षण क्षेत्रातील उल्लेखनीय कार्याचा गौरव करण्यात येणार आहे. हा पुरस्कार सोहळा रविवार, दिनांक ११ जानेवारी-२०२६ रोजी दुपारी- ०१:०० वाजता, अस्माली हॉल, आजम कॅम्पस, हिदायतुल्ला रोड, न्यू मोदिखाना कॅम्प, पुणे येथे संपन्न होणार आहे. या कार्यक्रमाला मराठवाडा शिक्षक आमदार मा.श्री.विक्रम काळे हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार असून, महाराष्ट्र कॉस्मोपॉलिटन एज्युकेशन सोसायटी, पुणे यांच्या अध्यक्षा मा.श्रीमती आबेदा इनामदार या कार्यक्रमास मार्गदर्शन करणार आहेत. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान क्रांतिकारी शिक्षक संघटनेचे संस्थापक सचिव श्री.हाजी शाहेद कादरी भूषवणार आहेत. या पुरस्कार सोहळ्यात राज्यभरातून निवड करण्यात आलेल्या गुणवंत शिक्षकांना त्यांच्या उत्कृष्ट अध्यापन कार्यासाठी, सामाजिक बांधिलकीसाठी आणि शिक्षण क्षेत्रातील भरीव योगदानासाठी "आदर्श शिक्षक पुरस्कार" प्रदान करण्यात येणार आहे. शिक्षकांचा सन्मान करून समाजात शिक्षणाचे महत्त्व अधोरेखित करणे, तसेच शिक्षकांना प्रेरणा देऊन शैक्षणिक गुणवत्ता अधिक वृद्धिंगत करणे हा या उपक्रमामागील प्रमुख उद्देश असल्याचे आयोजकांनी सांगितले. या कार्यक्रमास शिक्षण क्षेत्रातील मान्यवर, विविध सामाजिक व शैक्षणिक संस्थांचे पदाधिकारी तसेच राज्यभरातील मोठ्या संख्येने शिक्षक बांधव उपस्थित राहणार आहेत.

# लोकशाही वाचवण्यासाठी काँग्रेसची लढाई ; हर्षवर्धन सपकाळ

## सत्ताधाऱ्यांची गुंडगिरी; ‘स्थानिक’च्या निवडणुकीत राज्यात तीन खून.

**दैनिक युवक आधार**
**अहिल्यानगर / प्रतिनिधी :** राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत सत्ताधारी पक्षाकडून मोठ्या प्रमाणात गुंडगिरी करून उमेदवारांना धमकावले जात आहे, पैशांचे आमिष दाखवून अर्ज भरु दिला जात नाही. भरला तर मागे घेण्यास भाग पाडले जात आहे. पोलिस यंत्रणा, प्रशासन व निवडणूक आयोग सत्ताधारी पक्षाचे बटिक बनले आहे. लोकशाहीत निवडणुका निकोप, पारदर्शक व भयमुक्त वातावरणात पार पडल्या पाहिजेत पण त्याला हरताळ फासला आहे. सत्तेचा खेळ नाही तर लोकशाही वाचवण्यासाठी काँग्रेसची लढाई आहे, असे काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी म्हटले आहे.



निवडणुकांच्या प्रचार दौऱ्यावर सपकाळ यांनी आज अहिल्या नगरमध्ये पत्रकार परिषदेला संबोधित केले. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस (श.प) पक्षाचे खासदार निलेश लंके, प्रदेश काँग्रेसचे उपाध्यक्ष शरद अहेर यांच्यासह काँग्रेस आघाडीचे पदाधिकारी उपस्थित होते.

सपकाळ पुढे म्हणाले की, विरोधकांना प्रचार करता येऊ नये यासाठी सत्ताधारी पक्ष त्यांची कोंडी करत आहे. विरोधपक्षांना हेलिकॉप्टर मिळू नये, प्रचार सभेसाठी मैदाने मिळू नये यासाठी अटकाव केला जातो. निवडणूकीत हिंसक घटनाही मोठ्या प्रमाणात वाढल्या आहेत. उमेदवारांना धमकावण्यासाठी खुलेआम बंदुका, कोयते घेऊन फिरत आहेत. राज्यात अकोट, सोलापूर व खोपोली या ठिकाणी आतापर्यंत तीन खून झाले आहेत, हे लोकशाहीसाठी घातक आहे. असे सपकाळ म्हणाले.

महानगरपालिकांच्या निवडणुका या पाणी, स्वच्छता, रस्ते, आरोग्य, शिक्षण यासारख्या महत्वाच्या प्रश्नांवर झाल्या पाहिजेत पण भाजपा महायुती मात्र यावर बोलत नाही. महापौर मराठी हवा की ऊर्दू, खान हवा की बाण बवा यावर भाजपा व मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस बोलत आहेत. दुसरीकडे सत्तेतील तिन मित्रपक्षच एकमेकावर आरोप करत आहेत, हे त्यांचे फिक्सिंग आहे, नुरा कुस्ती आहे. भाजपा जगातील सर्वात मोठा पक्ष व त्यांचे नेतृत्व विश्वगुरु असल्याचा टेंभा मिरवत असते पण हा त्यांचा दावा पोकळ आहे. भाजपामध्ये लायक नेते, पदाधिकारी, कार्यकर्ते व उमेदवारही नाहीत, त्यांना ते विरोध पक्षातून साम, दाम, दंड, भेद, नितीचा वापर करून आणावे लागत आहेत. भाजपातील निष्ठावान कार्यकर्त्यांना फक्त सतरंजा उचलण्याचे काम ठेवले आहे. भाजप विरोध पक्षांच्या नेत्यांना खाणारी चेटकीण आहे असे काँग्रेस प्रदेशाध्यक्ष सपकाळ म्हणाले.

# चाचा नेहरू बाल महोत्सवाचे उद्घाटन उत्साहात संपन्न

## अनाथ मुलांचा क्रीडा व सांस्कृतिक महोत्सवाला सुरुवात

**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधी सतीश कडू :** दि. ८ ग्रामीण पोलीस मुख्यालयाच्या पटांगणावर आयोजित चाचा नेहरू बाल महोत्सवाचे उद्घाटन विभागीय उपायुक्त (महिला व बाल विकास) दत्तात्रय मुंडे यांच्या हस्ते आज उत्साहपूर्ण वातावरणात पार पडले. हा महोत्सव दि. ८ जानेवारी ते १० जानेवारी या कालावधीत आयोजित करण्यात आला असून, यामध्ये अनाथ व काळजी व संरक्षणाची गरज असलेल्या मुलांसाठी विविध क्रीडा तसेच सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.



उद्घाटनप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून विभागीय उपायुक्त (महिला व बाल विकास) दत्तात्रय मुंडे, जिल्हा महिला व बालविकास अधिकारी सुनील मेसरे, बालविकास प्रकल्प अधिकारी अपर्णा कोल्हे, अंजली निंबाळकर, शिला मांडवेकर, रंजीत कुरे, भाऊसाहेब गडदे, बालकल्याण समितीच्या अध्यक्ष छाया राऊत यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

या महोत्सवाच्या माध्यमातून मुलांमधील कला, क्रीडागुण, आत्मविश्वास व संघभावना विकसित होण्यास मदत होणार असून, त्यांच्या सर्वांगीण विकासासाठी हा उपक्रम अत्यंत महत्त्वाचा असल्याचे मत मान्यवरांनी व्यक्त केले.कार्यक्रमाचे संचालन साधना हटवार यांनी केले, तर आभार प्रदर्शन जिल्हा बाल संरक्षण अधिकारी मुस्ताक पठाण यांनी केले. कार्यक्रमास उपस्थित मान्यवर, अधिकारी, कर्मचारी तसेच बालकांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदवून उद्घाटन सोहळा यशस्वी केला.

# रस्ते विकासासाठी 11 कोटी तर पायाभूत सुविधांच्या कामासाठी 4 कोटी ; आमदार अब्दुल सत्तार यांच्याहस्ते विविध विकास कामांचा भूमिपूजन थाटात

**दैनिक युवक आधार**
**सोयगाव तालुका प्रतिनिधी/ विजय काळे :** माजी मंत्री आमदार अब्दुल सत्तार यांच्या पुढाकाराने जामठी ते सावळदबारा तसेच घाणेगाव -जयदेववाडी देऊळगाव ( गुजरी ) रस्त्याचे रुंदीकरण, मजबुतीकरण , काँक्रीटीकरणं व डांबरीकरण या कामासाठी जवळपास ११ कोटी रुपयांचा निधी शासनाने मंजूर केला. या कामासह जवळपास ४ कोटी रुपयांच्या विविध विकास कामांचा भूमिपूजन सोहळा आमदार अब्दुल सत्तार यांच्याहस्ते संपन्न झाला.सोयगाव तालुक्यातील सर्वांगीण विकासाच्या दृष्टीने पिंपळा, जामठी, ठाणा , फर्दापूर तांडा, फर्दापूर, डाभा, घाणेगाव, चारुतांडा, मोलखेडा, देव्हारी, टिटवी या गावांमध्ये पायाभूत मूलभूत विकास कामांसाठी मंजूर जवळपास ३ कोटी ७० लाख रुपयांच्या विविध विकास कामांचे भूमिपूजन आमदार अब्दुल सत्तार यांच्याहस्ते संपन्न झाले.या कामांमध्ये रस्ते विकास, विविध विकास कामांचे बांधकाम, सभामंडप तसेच इतर नागरी सुविधा विकासकामांचा समावेश आहे.



मतदारसंघातील नागरिकांच्या मूलभूत गरजांना प्राधान्य देऊन विकासकामे राबवली जात आहे. भूमिपूजन करण्यात आलेल्या कामांसाठी निधीची कमतरता भासू दिली जाणार नाही अशी ग्वाही आमदार अब्दुल सत्तार यांनी यावेळी दिली. गुणवत्तापूर्ण आणि निर्धारित वेळेत कामे पूर्ण करण्यावर अधिकाऱ्यांनी भर द्यावा अशा सूचना त्यांनी अधिकाऱ्यांना दिल्या.

**जामठी ते सावळदबारा तसेच घाणेगाव -जयदेववाडी देऊळगाव ( गुजरी ) रस्ता होणार गुळगुळीत**

उपमुख्यमंत्री ना. एकनाथराव शिंदे साहेब यांच्या नेतृत्वाखाली व आमदार अब्दुल सत्तार यांच्या पुढाकाराने महाराष्ट्र शासनाने सोयगाव तालुक्यातील जामठी - पळसखेडा- टिटवी - सावळदबारा या रस्त्याच्या कामासाठी 8 कोटी 50 लाख तर घाणेगाव - जयदेववाडी सावळदबारा - देऊळगाव ( गुजरी ) या रस्त्यासाठी 2 कोटी 7 लाख रुपयांचा निधी मंजूर केला.

या कामाचे भूमिपूजन आ. अब्दुल सत्तार यांच्याहस्ते संपन्न झाले. भूमिपूजन करण्यात आलेल्या रस्त्यामुळे नागरिकांची दैनंदिन ये-जा सुलभ होणार असून विकासाला चालना मिळणार आहे. विविध गावात संपन्न झालेल्या विकास कामांच्या भूमिपूजन प्रसंगी शिवसेना उपजिल्हाप्रमुख प्रभाकर आबा काळे शिवसेना तालुकाप्रमुख धरमसिंग चव्हाण कृषी उत्पन्न बाजार समिती संचालक दारासिंग चव्हाण माजी सरपंच शिवाप्पा चोपडे माजी सरपंच लूखमान सेठ मदन राठोड महेश राठोड मुकेश चव्हाण राधेश्याम जाधव सांडू तडवी सरपंच ज्ञानेश्वर वारंगणे इत्यादी सर्व शिवसेना पदाधिकारी उपस्थित होते.

# जिल्ह्यात २० जानेवारीपर्यंत कलम ३७ अंतर्गत प्रतिबंधात्मक आदेश लागू

**दैनिक युवक आधार**
**उपजिल्हा प्रतिनिधी वाशिम /गजानन पवार पाटील :** जिल्ह्यात सुरू असलेला परमहंस संत श्री झोलेबाबा यात्रा महोत्सव, १२ जानेवारी रोजी होणारा राजमाता जिजाऊ जन्मोत्सव, १४ जानेवारीचा मकरसंक्रांत सण तसेच १७ जानेवारीचा मुस्लीम धर्मीयांचा शब्बे मिराज या पार्श्वभूमीवर जिल्ह्यात कायदा व सुव्यवस्था अबाधित राहावी यासाठी जिल्हादंडाधिकारी योगेश कुंभेजकर यांनी मुंबई पोलीस अधिनियम १९५१ च्या कलम ३७ (१) (३) अन्वये प्रतिबंधात्मक आदेश लागू केले आहेत.

हा आदेश २० जानेवारी पर्यंत संपूर्ण वाशिम जिल्ह्यात लागू राहणार आहे.

या कालावधीत सार्वजनिक शांतता व सुव्यवस्था धोक्यात येऊ नये यासाठी विविध बाबींवर कडक निर्बंध घालण्यात आले आहेत.

या आदेशानुसार शस्त्रे, तलवारी, लाठ्या, काठ्या, सुरे, बंदुका, दगड, स्फोटक किंवा दाहक पदार्थ बाळगणे, वाहून नेणे किंवा साठवणे प्रतिबंधित करण्यात आले आहे. तसेच प्रक्षोभक घोषणा देणे, वाद्य वाजवून गोंधळ घालणे, बिभत्स प्रदर्शन, प्रतिमा मिरवणे किंवा जनतेमध्ये द्वेष, तणाव निर्माण करणारे फलक, चित्रे, भाषणे किंवा प्रचार करण्यास मनाई करण्यात आली आहे.

तसेच सार्वजनिक ठिकाणी किंवा रस्त्यावर पाच किंवा त्यापेक्षा अधिक व्यक्तींचा जमाव व मिरवणुका काढण्यास बंदी घालण्यात आली आहे.

मात्र हा आदेश शासकीय कर्तव्यावर असलेले पोलीस व इतर शासकीय कर्मचारी, विवाह समारंभ, अंत्ययात्रा तसेच सक्षम अधिकाऱ्यांच्या परवानगीने आयोजित मिरवणुका व कार्यक्रमांना लागू राहणार नाही, असेही आदेशात स्पष्ट करण्यात आले आहे.

सण-उत्सवाच्या कालावधीत नागरिकांनी शांतता व कायदा-सुव्यवस्था राखण्यासाठी प्रशासनाला सहकार्य करावे, असे आवाहन जिल्हा प्रशासनाने केले आहे.

# जाफराबाद तालुका नवनियुक्त पदभार स्वीकारल्याने गटविकास अधिकारी मगर यांचे स्वागत करताना प्रहार सघटनेचे पदाधिकारी व कार्यकर्ते

**दैनिक युवक आधार**
**जाफराबाद सर्कल प्रतिनिधी/दिनकर जंजाळ :** जाफराबाद तालुक्यातील नवनिर्वाचित गटविकास अधिकारी देविदास मगर यांचे स्वागत करताना जाफराबाद प्रहार संघटनेचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.सुनील पंडित.प्रहार जनशक्ती पक्ष तालुकाध्यक्ष जाफराबाद.सिद्धेश्वर वरागणे.सचिव जालना.अरुण जंजाळ.उपाध्यक्ष जाफराबाद.मनोहर जंजाळ.जगणं गवळी. दागडूबा शिंदे.तान्हाजी पंडित. किशोर भिसे पंढरी म्हस्के .संदीप शिंदे.एकनाथ पाचाराने. अमोल शिंदे.ज्ञानेश्वर बनकर.अदी उपस्थित होते.



# हणेगाव येथे भव्य रक्तदान शिबीराचे आयोजन

**दैनिक युवक आधार**
**तालूका प्रतिनिधी/महादेव उप्पे :** देगलूर(दि.१०) देगलूर तालुक्यातील मौजे हणेगाव येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात जगदगुरू श्रीमद रामानंदाचार्य नरेंद्राचार्य दक्षिण पीठ नाणिजधाम २०२६ जीवनदान महाकुंभाच्या माध्यमातून भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.या शिबीरामध्ये हणेगाव व परिसरातील शेकडो भाविक भक्तांनी रक्तदान करून कार्यक्रम यशस्वीरित्या पार पाडला.



यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून भारतीय जनता पक्षाचे तालूकाध्यक्ष ॲड.प्रितम बाळासाहेब देशमूख,तंटामुक्ती अध्यक्ष योगेश आबासाहेब देशमुख, हणेगाव ग्रामपंचायतीचे सरपंच प्रतिनिधी तथा कै.इंदिराबाई देशमूख माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाचे संस्थापक अध्यक्ष शंकरराव राठोड,ग्रामपंचायत सदस्य विवेक पडकंठवार,वझर येथील धनाजी लवटे यांच्यासह अनेक मान्यवर यावेळी उपस्थित होते.

# पिंपळा जिल्हा परिषद शाळेची शैक्षणिक सहल उत्साहात रवाना

## अजिंठा–वेरूळ लेणी व छत्रपती संभाजीनगरकडे विद्यार्थ्यांची ऐतिहासिक सफर

**दैनिक युवक आधार**
**करण धोंगडे वाशीम जिल्हा प्रतिनिधी :** (मालेगाव)पिंपळा येथील जिल्हा परिषद शाळेच्या वतीने विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक, बौद्धिक व सांस्कृतिक विकासासाठी ऐतिहासिक व शैक्षणिक सहल आयोजित करण्यात आली असून आज सकाळी ही सहल अजिंठा–वेरूळ लेणी व छत्रपती संभाजीनगर या ठिकाणी मोठ्या उत्साहात रवाना झाली. ही सहल शाळेचे सजन सर मुख्याध्यापक आदरणीय नरवाडे सर यांच्या मार्गदर्शनाखाली यशस्वीरीत्या पार पडत आहे.



या सहलीत शाळेतील विद्यार्थी गणवेशात शिस्तबद्ध पद्धतीने सहभागी झाले असून सहलीपूर्वी सामूहिक फोटो काढण्यात आला. विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर आनंद, उत्साह व जिज्ञासा स्पष्टपणे दिसून येत होती. सहलीसाठी बस व इतर वाहने उपलब्ध करून देण्यात आली असून सर्व नियोजन काटेकोरपणे करण्यात आले आहे.

अजिंठा व वेरूळ लेणी ही जागतिक वारसा स्थळे असून तेथील प्राचीन भित्तीचित्रे, शिल्पकला व स्थापत्यकलेचा अभ्यास विद्यार्थ्यांसाठी अत्यंत उपयुक्त ठरणार आहे. तसेच छत्रपती संभाजीनगर येथील ऐतिहासिक स्थळांना भेट देत विद्यार्थ्यांना महाराष्ट्राच्या गौरवशाली इतिहासाची प्रत्यक्ष माहिती मिळणार आहे.

या शैक्षणिक सहलीत शाळेचे सर्व शिक्षकवृंद व शिक्षकेतर कर्मचारी सहभागी झाले असून विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेसाठी आवश्यक ती सर्व खबरदारी घेण्यात आली आहे. सहलीदरम्यान शिस्त, वेळेचे पालन व सुरक्षितता याबाबत विशेष लक्ष देण्यात येत आहे.

मुख्याध्यापक आदरणीय नरवाडे सर यांनी सांगितले की, “अशा शैक्षणिक सहलींमुळे विद्यार्थ्यांना केवळ पुस्तकातील ज्ञान न राहता प्रत्यक्ष अनुभवातून शिकण्याची संधी मिळते. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी असे उपक्रम अत्यंत महत्त्वाचे आहेत.”

पिंपळा येथील जिल्हा परिषद शाळेचा हा उपक्रम पालकवर्ग व ग्रामस्थांकडून कौतुकास पात्र ठरत असून इतर शाळांसाठीही तो प्रेरणादायी ठरत आहे.

# विदर्भ हिंदी साहित्य संमेलन मधे दोन प्रख्यात डॉक्टरांशी हितगुज

**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधी राहुल मडावी**
**नागपूर :** विदर्भ हिंदी साहित्य सम्मेलन, नागपूर यांच्या लोकप्रिय कार्यक्रम-मालिका ‘संवाद’ अंतर्गत रविवार, ४ जानेवारी २०२६ रोजी सीताबर्डी येथील मोर हिंदी भवन येथे सुप्रसिद्ध हृदयरोग तज्ज्ञ व लेखक डॉ. कीर्ती तन्ना यांच्याशी साहित्यिक डॉ. सागर खादीवाला यांची अर्थपूर्ण व विचारप्रवर्तक संवादात्मक बैठक संपन्न झाली.




कार्यक्रमात डॉ. कीर्ती तन्ना यांनी आपल्या जीवनप्रवास, संघर्ष, अनुभव, वैद्यकीय सेवा तसेच साहित्यलेखनामागील प्रेरणा यावर मनमोकळेपणाने संवाद साधला. बहुतांश आजार हे चुकीच्या जीवनशैली व आहारातील दुर्लक्षामुळे उद्भवतात. हृदय निरोगी ठेवण्यासाठी जिभेवर नियंत्रण, नियमित दिनचर्या, हलका व्यायाम व मानसिक समतोल आवश्यक असल्याचे त्यांनी नमूद केले.

तणावमुक्त जीवनाचे महत्त्व विशद करताना डॉ. तन्ना यांनी मित्रांशी संवाद, हलका विरंगुळा आणि कुटुंबासोबत वेळ घालविणे अत्यंत गरजेचे असल्याचे सांगितले. डॉ. सागर खादीवाला यांनी संवादाच्या माध्यमातून डॉ. तन्ना यांच्या ‘रिटायरमेंट’ या पुस्तकासह त्यांच्या जीवनातील विविध पैलू व संस्मरणीय अनुभव श्रोत्यांसमोर प्रभावीपणे मांडले.

या कार्यक्रमाला साहित्य, वैद्यकीय, शैक्षणिक व सामाजिक क्षेत्रातील मान्यवरांची मोठ्या संख्येने उपस्थिती लाभली. श्रोत्यांनी संपूर्ण कार्यक्रमात उत्स्फूर्त प्रतिसाद दिला तसेच प्रश्नोत्तर सत्रात सक्रिय सहभाग नोंदविला.

कार्यक्रमाचा समारोप विदर्भ हिंदी साहित्य सम्मेलनतर्फे आभारप्रदर्शनाने करण्यात आला.

# सोयगाव तालुक्यात वंचित बहुजन आघाडीचा संवाद सर्कल मेळावा उत्साहात संपन्न

**दैनिक युवक आधार**
**सोयगाव तालुका प्रतिनिधी/ विजय काळे** : तालुक्यातील सावळदबारा-पिंपळवाडी येथे वंचित बहुजन आघाडीचा संवाद सर्कल मेळावा प्रमुख पदाधिकाऱ्यांच्या उपस्थितीत उत्साहात पार पडला. या मेळाव्याला नागरिकांचा चांगला प्रतिसाद लाभला. वंचित बहुजन आघाडीचे जिल्हाध्यक्ष ॲड.रामेश्वर बापू तायडे यांच्या मार्गदर्शनाखाली तालुका तसेच गण-गट पदाधिकाऱ्यांची तालुकानिहाय बैठक घेण्यात आली. आगामी जिल्हा परिषद व पंचायत



समिती निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर संघटन मजबूत करण्यासाठी पदाधिकाऱ्यांनी जोमाने कामाला लागावे, अशा सूचना जिल्हाध्यक्ष ॲड.तायडे यांनी दिल्या.या संवाद सर्कल मेळाव्याला जिल्हा महासचिव रामदास वाघमारे, जिल्हा उपाध्यक्ष मुंजा तुपासमदिरे, जिल्हा संघटक सांडू श्रीखंडे,सिल्लोड तालुकाध्यक्ष बनेखा पठाण यांच्यासह तालुकाध्यक्ष सचिन शिंदे,स्वागताध्यक्ष मनोहर जगताप,दिलीप सुरडकर,जितेंद्र मगरे,शेख जावेद,विनोद कोते,हरिदास चौतमल,शिवराम जाधव,भारत नावकर, मनोज म्हस्के, दीपक अवचार,शरद नावकर,नंदकिशोर सदाशिवे,अमोल जाधव, जुगराज राठोड,आकाश जाधव, शरद पवार आदी पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# राष्ट्रीय चर्चासत्रात शालेय नेतृत्वाचे प्रभावी सादरीकरण

**दैनिक युवक आधार**
**उपजिल्हा प्रतिनिधी वाशिम /गजानन पवार पाटील** : आदर्श शिक्षक श्री. डिगांबर घोडके यांचे सर्वत्र कौतुक.निपा (NIPA) आणि मिपा (MIPA) या संस्थांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित राष्ट्रीय स्तरावरील चर्चासत्र संभाजीनगर संभाजीनगर येथे, नुकतेच संपन्न झाले. या चर्चासत्रामध्ये शालेय नेतृत्व आणि विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास या महत्त्वपूर्ण विषयावर देशभरातील शिक्षणतज्ज्ञ, संशोधक व शिक्षकांनी सहभाग नोंदवला.




या राष्ट्रीय चर्चासत्रात वाशिम जिल्ह्यातील प्रसिद्ध जिल्हा परिषद शाळा भारतरत्न अटल बिहारी वाजपेयी आंतरराष्ट्रीय जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा, साखरा* येथील आदर्श पदवीधर शिक्षक श्री. डिगांबर भगवान घोडके यांनी सक्रिय सहभाग घेतला. त्यांनी शालेय नेतृत्व आणि विद्यार्थी शिक्षण या विषयावर आपल्या शाळेच्या यशस्वी कार्यपद्धतीचे सखोल व प्रभावी सादरीकरण केले.

सदर सादरीकरणामध्ये शाळेतील शैक्षणिक गुणवत्ता, नाविन्यपूर्ण उपक्रम, विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास, नेतृत्व कौशल्यांचा विकास तसेच ग्रामीण भागातील शाळा आंतरराष्ट्रीय दर्जाकडे नेण्यासाठी राबविण्यात येणाऱ्या उपक्रमांची सविस्तर मांडणी करण्यात आली. त्यांच्या सादरीकरणास चर्चासत्रात उपस्थित तज्ज्ञ, शिक्षक व प्रतिनिधींनी विशेष दाद दिली.

राष्ट्रीय पातळीवर आपल्या शाळेचे नेतृत्व व कार्य प्रभावीपणे मांडल्याबद्दल श्री. डिगांबर घोडके यांचे सर्व स्तरातून कौतुक करण्यात येत असून, त्यांच्या या यशामुळे वाशिम जिल्ह्याच्या शैक्षणिक क्षेत्राचा नावलौकिक वाढला आहे.

# "मराठी शाळा टिकवणे हीच काळाची हाक!" - संजय कुलकर्णी

## केऱ्हाळा शाळेत 'दर्पण दिन' उत्साहात साजरा

**दैनिक युवक आधार**
**योगेश पालोदकर/ सिल्लोड** :- "जिल्हा परिषदेच्या शाळांमधून विद्यार्थ्यांचा सर्वांगीण भौतिक विकास साधण्यासाठी शासन स्तरावर विविध योजना राबवल्या जात आहेत. मात्र, केवळ योजनांनी नव्हे तर सामाजिक पाठबळाने या शाळा वाचवणे ही काळाची गरज आहे. जिल्हा परिषद शाळा टिकल्या तरच ग्रामीण भागातील विद्यार्थी आणि आपली मराठी भाषा जिवंत राहील. या पवित्र कार्यासाठी अखिल भारतीय मराठी पत्रकार संघ पूर्णतः कटिबद्ध आहे," अशी ग्वाही जिल्हा पत्रकार संघाचे उपाध्यक्ष संजय कुलकर्णी यांनी दिली.





केऱ्हाळा (ता. सिल्लोड) येथील 'पीएमश्री' जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक आदर्श शाळेत 'दर्पण' दिना'निमित्त विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी अखिल भारतीय मराठी पत्रकार संघ व अखिल भारतीय ग्राहक पंचायत यांच्या संयुक्त विद्यमाने शालेय विद्यार्थ्यांना अल्पोपहाराचे (फराळाचे) वाटप करण्यात आले. हा उपक्रम विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर आनंद फुलवणारा ठरला.

कार्यक्रमाची सुरुवात आद्य पत्रकार आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांच्या प्रतिमेच्या पूजनाने झाली. उद्योजक पांडुरंग पाटील जिवरग यांच्या प्रमुख उपस्थितीत आणि मुख्याध्यापक रामचंद्र मोरे यांच्या अध्यक्षतेखाली हा सोहळा संपन्न झाला. यावेळी मान्यवरांनी पत्रकारांच्या सामाजिक जबाबदारीवर प्रकाश टाकला. शाळेच्या वतीने मुख्याध्यापक रामचंद्र मोरे व सहकाऱ्यांनी उपस्थित सर्व पत्रकारांचा यथोचित सन्मान केला.या सोहळ्याला पत्रकार संघाचे जिल्हा उपाध्यक्ष संजय कुलकर्णी, तालुकाध्यक्ष सचिन चौबे, निलेश सोनटक्के, राजू वैष्णव, अनिल कुलकर्णी, जावेद सौदागर, गजानन मरकड, दत्ता ढोरमारे, कैलास पांढरे, अंकुश पवार व विलास देहाडे यांची विशेष उपस्थिती होती.


हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शाळेतील सोमनाथ राणे, महानंदा राजपूत, रत्नकला इंगळे, वंदना साबळे, विभा मेश्राम, श्रीनिवास जाधव, महेंद्र सूर्यवंशी, रमेश पवार, संभाजी पाटील, तेजस क्षीरसागर, सुरेंद्र बबीरवाल, विद्या सरदार, स्वप्नजा पाटील, कविता तेली, सदानंदी दोडके, सुनीता निंभोरे, पूनम सोनवणे, नासिर अहमद, शेख कलिमुद्दीन, जुबेर कुरेशी, तहसीन शेख, शाजिया शेख, शाहीन परवीन, शितल महाले, कमल पांढरे, गणेश शिंदे, संजय सोनकांबळे, अब्दुल वहाब, अतुल कासारे आणि संतोष एंडोले यांनी अथक परिश्रम घेतले.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्रीनिवास जाधव यांनी केले, तर उपस्थितांचे आभार सोमनाथ राणे यांनी मानले. या उपक्रमाचे परिसरातून कौतुक होत आहे.

# श्रीवर्धनमध्ये प्रतिबंधित गोवंशीय मांस वाहतूकप्रकरणी कारवाई; आरोपी अटकेत

**दैनिक युवक आधार**
**श्रीवर्धन तालुका प्रतिनिधी/अनिकेत मोहित** : श्रीवर्धन तालुक्यात प्रतिबंधित गोवंशीय मांस विक्रीच्या उद्देशाने वाहतूक केल्याप्रकरणी पोलिसांनी कारवाई करत एका आरोपीला अटक केली आहे. ही घटना श्रीवर्धन भट्टीचामाळ विभागात, मुख्य रस्त्यालगत उघडकीस आली आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, शौकत गुलाम काझी (वय ५६ वर्षे, रा. आसिफ कॉम्प्लेक्स, श्रीवर्धन) हा आरोपी स्कूटीवरून प्रतिबंधित असलेले गोवंशीय प्राण्याचे मांस विक्रीसाठी घेऊन जात असल्याचे आढळून आले. तपासादरम्यान आरोपीकडून ३५ किलो वजनाचे, लालसर रंगाचे गोवंशीय मांस जप्त करण्यात आले असून त्याची अंदाजे किंमत ₹१०,५०० इतकी आहे.

या कारवाईत पोलिसांनी प्रतिबंधित मांस, एक गडद हिरवी स्कूटी तसेच एक लाल रंगाची टीव्हीएस एन. टॉर्क मॉडेलची स्कूटी (MH 06



CM 9836) असा एकूण ₹८५,५०० किमतीचा मुद्देमाल जप्त केला आहे.

या प्रकरणी फिर्यादी तुषार आठरे यांच्या तक्रारीवरून आरोपीविरुद्ध पशूसंरक्षण अधिनियम १९९५ चे कलम ६(अ), ५ तसेच इतर संबंधित कलमांखाली गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आरोपीला अटक करण्यात आली असून पुढील तपास श्रीवर्धन पोलीस करत आहेत.श्रीवर्धन शहरात प्रतिबंधित मांसाच्या बेकायदेशीर विक्री व वाहतुकीवर कठोर कारवाई केली जाईल, असा इशाराही पोलिसांनी यावेळी दिला आहे.

# सिल्लोडच्या मातीत अयोध्येचा 'राजध्वज'; पूर्णेश्वर चरणी 'कोविदार' रूपाने प्रभू रामांच्या स्मृतींचा अभिषेक!

**दैनिक युवक आधार**
**योगेश पालोदकर/सिल्लोड** : अयोध्येतील नूतन श्रीराम मंदिरावर पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि सरसंघचालक डॉ. मोहन भागवत यांच्या हस्ते जो 'जय ध्वज' फडकवण्यात आला, त्या धर्मध्वजावर अंकित असलेले रामराज्यातील राजचिन्ह आणि राजवृक्ष 'कोविदार' (रक्त कांचन) आता सिल्लोडमध्ये बहरणार आहे. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या वतीने येथील ऐतिहासिक पूर्णेश्वर महादेव मंदिर परिसरात या दुर्मिळ वृक्षाचे विधिवत रोपण करण्यात आले.



अयोध्येतील मंदिर लोकार्पणानंतर जिल्ह्यात प्रथमच असा उपक्रम राबवण्याचा मान सिल्लोड तालुक्याला मिळाला आहे. अयोध्येच्या धर्मध्वजावर कोविदार वृक्ष, 'ओम' आणि 'सूर्य' ही चिन्हे कोरलेली आहेत. हा वृक्ष पराक्रम, समृद्धी, ऊर्जा आणि धर्मरक्षेचे प्रतीक मानला जातो. कोविदार हा वृक्ष निसर्गत: वन्य अवस्थेत आढळतो. सरसंघचालक डॉ. मोहन भागवत यांच्या संकल्पनेतून आणि डॉ. संतोष पाटील यांच्या प्रयत्नांतून जंगलातून या वृक्षाचे विशेष बीज संकलन करून त्याची रोपे तयार करण्यात आली आहेत.

या वृक्षाचे रोपण शहरातील पूर्णेश्वर महादेव मंदिर आणि गणेश व्यवहारे यांच्या शेतातील महादेव मंदिर परिसरात गटविकास अधिकारी रत्नाकर पगार यांच्या हस्ते मंत्रोच्चारात करण्यात आले. यावेळी संघाचे जिल्हा व तालुका पदाधिकारी तसेच पंचक्रोशीतील भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते. अयोध्येतील ऐतिहासिक सोहळ्याचे स्मरण म्हणून हा 'राजवृक्ष' आता सिल्लोडच्या सौंदर्यात भर घालणार आहे.

**पर्यावरणीय मूल्य अन् औषधी गुणधर्म**

"कोविदार वृक्ष केवळ धार्मिकच नव्हे, तर पर्यावरणीय दृष्ट्याही महत्त्वाचा आहे. 'चिलादेस पांडव' या प्रजातीची फुलपाखरे या झाडाच्या पानांवर अंडी घालून आपला जीवनक्रम पूर्ण करतात.

# नायलॉन मांजामुळे जीविताला धोका; दबंग ठाणेदार भरत लसंते यांचा विक्रेत्यांना थेट इशारा

**दैनिक युवक आधार**
**करण धोंगडे/वाशिम जिल्हा प्रतिनिधी** : (कारंजा लाड)धनज बु. परिसरात नायलॉन मांजामुळे नागरिकांच्या जीविताला गंभीर धोका निर्माण झाला असून अपघातांच्या घटनांमध्ये लक्षणीय वाढ होत आहे. दुचाकीस्वार, पादचारी, लहान मुले तसेच निरपराध पक्षी नायलॉन मांजाचे बळी ठरत असल्याने नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे.

या पार्श्वभूमीवर धनज बुद्रुक पोलीस स्टेशनचे दबंग ठाणेदार भरत लसंते यांनी नायलॉन मांजाची विक्री, साठवणूक व वापर करणाऱ्या विक्रेत्यांना थेट व स्पष्ट इशारा दिला आहे. नायलॉन मांजा हा कायद्याने पूर्णतः प्रतिबंधित असून, त्याचा वापर अथवा विक्री करणाऱ्यांवर कोणतीही दयामाया न दाखवता थेट गुन्हे दाखल करण्यात येणार असल्याचे त्यांनी ठामपणे सांगितले.

ठाणेदार भरत लसंते यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस पथकाने धनज बुद्रुक परिसरात विशेष तपास मोहीम सुरू केली असून, अवैध नायलॉन मांजा विक्री करणाऱ्यांवर बारकाईने लक्ष ठेवण्यात येत आहे.

"नागरिकांचे प्राण धोक्यात घालणाऱ्यांना कोणत्याही परिस्थितीत माफ केले जाणार नाही. नायलॉन मांजामुळे जर कुणाचे जीवित धोक्यात आले, तर त्यास संबंधित विक्रेतेच जबाबदार धरले जातील," असा कडक इशाराही त्यांनी दिला.

पोलीस प्रशासनाच्या या आक्रमक भूमिकेमुळे नायलॉन मांजा विक्रेत्यांमध्ये खळबळ उडाली असून, कायदा व सुव्यवस्था अबाधित ठेवण्यासाठी धनज बुद्रुक पोलीस प्रशासन सज्ज झाले आहे. नागरिकांनी नायलॉन मांजाचा वापर टाळावा तसेच कुठेही अवैध विक्री आढळून आल्यास तात्काळ पोलीस प्रशासनाला माहिती द्यावी, असे आवाहन करण्यात आले आहे.

या कठोर कारवाईमुळे धनज बुद्रुक परिसर नायलॉन मांजा मुक्त होईल, अशी अपेक्षा नागरिकांमधून व्यक्त होत आहे.

# पत्रकारांच्या लेखांचा स्पर्धा परीक्षांच्या तयारीसाठी लाभ –पो. निरीक्षक राजेश खेर्डे यांचे प्रतिपादन; उपस्थितांना ठाणेदार राजेश खेर्डे यांनी संबोधित केले

**दैनिक युवक आधार**
**उपजिल्हा प्रतिनिधी वाशिम/ गजानन पवार पाटील** : पत्रकारांच्या वृत्तपत्रातील एखादा लाभ एन पी एस सी सारखा स्पर्धा परीक्षेची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांना होतो असे प्रतिपादन मालेगावचे ठाणेदार राजेश खेर्डे यांनी केले. ते ता सहा जानेवारी रोजी दुपारी 4.00 वाजता मालेगाव शहरातील श्री संत गजानन महाराज विद्यामंदिर येथे आयोजित पत्रकार दिनी कार्यक्रमात बोलावत होते कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मालेगाव तालुका मराठी पत्रकार परिषदेचे अध्यक्ष प्रा अरविंद गाभणे होते तर प्रमुख पाहुणे म्हणून ठाणेदार राजेश खेर्डे, पारसमल गोलेच्छा, यशवंतराव हिवराळे, सेवाराम आडे, प्रशांत लोखंडे भागवत मापारी किरण पखाले चंद्रकांत गायकवाड, सुभाष बळी उपस्थित होते. याप्रसंगी अध्यक्षीय मनोगत व्यक्त करताना प्राभणे म्हणाले की, मालेगाव तालुका मराठी पत्रकार परिषद, व्हॉइस ऑफ मीडिया, तसेच इतर पत्रकार संघटना मालेगाव शहरात एकजुटीने राहतात. यावर्षी कबड्डीचे



सामने प्रबोधन पर व्याख्याते आयोजित करणार आहेत. असे ते म्हणाले यावेळी पारसमल गोलेच्छा व्हॉइस ऑफ मीडिया चे जिल्हा अध्यक्ष भागवत मापारी, यशवंत हिवराळे, प्रशांत लोखंडे, संदीप भातुडकर किरण पखाले, सेवाराम आडे आदींनी विचार व्यक्त केले. कार्यक्रमाच्या सुरुवातीला बाळशास्त्री जांभेकर यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले यावेळी प्रदीप सावले,दत्तात्रय शिंदे. गोरखनाथ भागवत,विठ्ठल भागवत, अजिंक्य मेडशीकर, जावेद भवानीवाले, वसंतराव अवचार, कपिल भालेराव, गजानन कुठे कैलास भालेराव, पोलीस कॉन्स्टेबल जितू पाटील, हरीश ताटर, दीपक सारडा, विठ्ठल केळे, ॲड गोपाल वाढे, गजानन कुठे, शेख सलीम शेख अमीर आदी उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व आभार प्रदर्शन संदीप भातुडकर यांनी संचालक तालुका मराठी पत्रकार परिषदेचे सचिव शिवाजी खडसे यांनी केले.

# जानन विद्यालय आसडी येथे 'आनंद नगरी' उत्साहात साजरी; विद्यार्थ्यांनी अनुभवला 'शिका आणि कमवा'चा आनंद

**दैनिक युवक आधार**
**योगेश पालोदकर सिल्लोड**:- तालुक्यातील गजानन विद्यालय आसडी येथे ८ जानेवारी रोजी 'आनंद नगरी' प्रदर्शनाचे अत्यंत उत्साहात आयोजन करण्यात आले होते. विद्यार्थ्यांच्या सुप्त गुणांना वाव देण्यासाठी आणि त्यांना 'शिकण्यासोबत कमवा' या सूत्राचे महत्त्व पटवून देण्यासाठी हा उपक्रम राबवण्यात आला.

कार्यक्रमाचे शानदार उद्घाटन आसडी गावचे सरपंच सुधाकर मिरगे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी विद्यार्थ्यांनी विद्यालयाच्या प्रांगणात विविध प्रकारचे खाद्यपदार्थ आणि वस्तूंचे स्टॉल्स लावले होते. या स्टॉल्सना ग्रामस्थांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला, ज्यामुळे दिवसभरात सुमारे १० ते १५ हजार रुपयांची आर्थिक उलाढाल झाली. या उपक्रमातून विद्यार्थ्यांना व्यापार, व्यवहार ज्ञान आणि हिशोब ठेवण्याचे प्रत्यक्ष शिक्षण मिळाले. कार्यक्रमाचे मुख्य आकर्षण ठरला तो म्हणजे खास तयार करण्यात आलेला 'सेल्फी पॉईंट'. विद्यार्थी, शिक्षक आणि पालकांसाठी हा आकर्षणाचा केंद्रबिंदू ठरला होता.

याप्रसंगी शालेय समितीचे अध्यक्ष सांडू सुरडकर, विष्णू मेटे, सदस्य संपत मिरगे, जिल्हा परिषद शाळेचे मुख्याध्यापक पी. व्ही.



साळवे, गहिनीनाथ सिरसाट, संजय सोनोवने, गणपत मिरगे, केशवराव मिरगे, प्रभाकर टेकाळे यांची प्रमुख उपस्थिती होती.

तसेच विद्यालयाचे मुख्याध्यापक तुपे सर, अपार सर यांच्यासह गजानन विद्यालयाचा सर्व कर्मचारी वर्ग, रहीमाबाद परिसरातील नागरिक आणि माजी विद्यार्थ्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून विद्यार्थ्यांचा उत्साह वाढवला. सर्वांच्या सहकार्याने हा कार्यक्रम अत्यंत खेळीमेळीच्या वातावरणात पार पडला.